
मुलांवर चांगले संस्कार करणारी

॥ मुलांसाठी श्रीज्ञानेश्वरी ॥



सौ. वि. सी. गुर्जर एम्.ए.बी.एड्.

साहित्य विशारद निवृत्त उपमुख्याध्यापिका

राजापूर हायस्कूल, राजापूर

मुलांसाठी ज्ञानेश्वरी

सौ. वि. सी. गुर्जर



मनोरमा
प्रकाशन

प्रकाशक :
अनिल रघुनाथ फडके
मनोरमा प्रकाशन
१०२/सी, माधववाडी, पहिला मजला,
दादर (पूर्व) स्टेशनसमोर, दादर.
मुंबई - ४०० ०१४.
फोन २४१४८२९९

लेखिका : सौ. वि. सी. गुर्जर
गुजराळी,
ता. राजापूर, जि. रत्नागिरी,
पिन - ४१६ ७०२.
फोन (०२३५३) २२२१५२

प्रकाशन : आषाढी एकादशी २०१४
दुसरी आवृत्ती : आषाढी एकादशी २०१६

चित्रकार : संतोष बेलाटीकर

आतील रेखाचित्रे : विजय शिंदे

अक्षर जुळणी आणि मुद्रण :
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट
१२४३/७७, जी. के. हाईटस्,
ई वॉर्ड, शिवाजी उद्यमनगर,
कोल्हापूर - ४१६ ००८

।। मनोगत ।।

माझे ज्येष्ठ बंधू ती. दादा तथा मोरेश्वर विनायक नानिवडेकर (रिटा. ग्रुपकॅप्टन) हे दोन वर्षांपूर्वी माझ्याकडे राजापूरला आलेले होते. त्यावेळी मी ज्ञानेश्वरीचा अभ्यास करीत होते, म्हणून ज्ञानेश्वरीसंबंधी थोडी ग्रंथसंपदा जमवली होती. माझे हे बंधू खाणे-पिणे गप्पागोष्टी यापेक्षा संगीत, पुस्तकवाचन यात जास्त रमणारे. म्हणून त्यांचे आवडते खाद्य-पुस्तक-दैनंदिन ज्ञानेश्वरी ले. प्र. न. जोशी-मनोरमा प्रकाशन-मी त्यांच्या समोर ठेवले. त्यांनी एकदा हातात घेतलेले पुस्तक पूर्ण केल्याशिवाय खाली ठेवलेच नाही. संत ज्ञानेश्वरांच्या अमृतमय ओव्या व त्यांचे रसाळ विवेचन त्यांना फार आवडले.

पुस्तक वाचून झाल्यावर ज्ञानेश्वरीतील एक ओवी त्यांनी मला दाखवली-

तेणे आबालसुबोधे । ओवियेचेनि प्रबंधे।
ब्रह्मरससुखस्वादे । अक्षरे गुंथिली ।। (१८-१७४२)

आणि मला सांगितले की, 'बालकांसाठी ज्ञानेश्वरी' हा तुझा पुढचा प्रोजेक्ट !' मलाही हा विचार पटला. पण मी विचार केला, मी जे काही लिहीन, ती माझी सेवा बालकांपर्यंत पोहचणार कशी? मग मी मनोरमा प्रकाशनच्या श्री. अनिल फडकेंना फोन केला. त्यांनी सांगितले की, आधी 'मुलांसाठी दासबोध' पन्नास पानापर्यंत लिहा, माझ्यात ते सामर्थ्य नाही याची जाणीव असूनही मी ते धाडस केले. नंतर श्री. अनिल फडके म्हणाले,

'आता काय लिहिता? 'मुलांसाठी ज्ञानेश्वरी' लिहा.' मी सांगितले, 'प्रथम 'मुलांसाठी भगवद्‌गीता' लिहिते.' तेही पुस्तक लिहिले. 'मुलांसाठी ज्ञानेश्वरी' लिहायची म्हटलं तर ज्ञानेश्वरीच्या नऊ हजार ओव्यांमधून मुलांसाठी नेमके काय निवडायचे ते समजेना. मग माझे आत्येभाऊ ती. प्रभाकरभाऊ-श्री. प्रभाकर गंगाधर हिर्लेकर-रुपारेल कॉलेजचे माजी प्राचार्य यांचे मार्गदर्शन घेतले. त्यामुळे या लेखनाला दिशा मिळाली.

या ग्रंथलेखनासंबंधी श्री. अनिल फडके यांनी मला संधी दिली व जो विश्वास दाखवला, त्याबद्दल मी त्यांची अत्यंत ऋणी आहे.

श्रीज्ञानेश्वरांच्या शब्दात सांगायचे तर-

''आणि क्षीरसिंधूचिया तटा। पाणिया येती गजघटा।
तेथ काय मुरकुटा। वारिजतसे।।'' (१८-१७११)

क्षीरसागराच्या तीरावर पाणी पिण्यासाठी गजेंद्राचा कळप जेथे येतो, तो सागर चिलटांना नको म्हणतो का? श्रीज्ञानेश्वरांवरील भक्तीमुळे व विद्यार्थ्यांवरील प्रेमाने मी हे धाडस करीत आहे.

'तरी न्यून ते पुरते। अधिक ते सरते।
करुनि घेयावे हे तुमते। विनवितु असे।।'' (१-८०)

तरी वाचकहो, बालकहो, मी तुम्हाला हात जोडून नम्रपणे विनंती करीत आहे की, माझ्या लेखनात्त, विचारात जे काही कमी पडेल, उणे दिसेल ते तुम्ही समजून घ्यावे आणि मला सांभाळून घ्यावे. माझ्याकडून काही कमी अधिक लिहिले गेले असेल तर उदार मनाने मला क्षमा करावी.

***

॥ श्री ॥

'कैवल्याचा पुतळा।
प्रगटला भूतळा।
चैतन्याचा जिव्हाळा।
ज्ञानोबा माझा ॥'

– संत एकनाथ

॥ श्री संत ज्ञानेश्वर चरणी अर्पण ॥

– सौ. वि. सी. गुर्जर

- विषयानुक्रम -

प्रकरण
१

प्रस्तावना

****

'नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी!' हा ग्रंथ सर्वश्रेष्ठ आहे, असा निर्वाळा फक्त नामदेवांनीच दिला असे नाही तर मराठीत उपलब्ध असलेल्या सर्वच काव्य समीक्षकांनी व टीकाकारांनी मान्य केले आहे. ज्ञानेश्वरी हे प्रथम श्रेणीचे-उच्च दर्जाचे काव्य आहे, यात दुमत नाही.

ज्ञानेश्वरी हे काव्य नसून शब्दसुमनांचे सुंदर भरजरी वस्त्र आहे. त्यामधील भिन्न रंगाची उधळण मन आणि अंत:करण आकर्षून घेते. जगात कोणालाही न मिळालेली 'माऊली' ही पदवी ज्ञानेश्वरीला सर्वांनी एकमताने दिली. 'ज्ञानेश्वर माऊली' हा महाराष्ट्राचा महामंत्र झाला

आहे. भावनांची कोमलता; कल्पनाशक्तीची उदारता; मृदुमधुर शब्दांची समृद्धी; रचनेची सहजता आणि सरलता हे सर्व प्रथम श्रेणीच्या काव्यातले विशेष ज्ञानेश्वरीत आढळतात. जगाच्या वाङ्मयातील अत्युच्च श्रेणीतील कोणत्याही काव्याची बरोबरी करू शकेल इतकी या ज्ञानेश्वरांच्या भावार्थदीपिकेची–ज्ञानेश्वरीची थोरवी आहे.

ज्या वयात ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहिली त्या वयातील मुलांना या श्रेष्ठ, उच्च काव्याची तोंडओळख तरी करून द्यावी, म्हणून हे पुस्तक तुमच्यापुढे ठेवत आहे. उदात्त विचार तुमच्या पुढे ठेवण्यास तुमचे वय योग्य आहे, असे मला वाटते.

तुमच्या पैकी अनेक जण इंग्रजी माध्यमातून शिकत असाल. परंतु तुमची मातृभाषा मराठी आहे. या मराठी भाषेला समाजमान्यता ज्ञानेश्वरांनी मिळवून दिली. संस्कृत भाषेचा प्रभाव असताना श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील विचार सामान्य लोकांच्या भाषेतून त्यांच्यापुढे ठेवून ज्ञानेश्वरांनी ही ज्ञानाची ज्योत समाजात लावली. त्यामुळे मराठी भाषेचाच नव्हे तर धर्म, संस्कृती, समाज यांचा विकास झाला. अंधश्रद्धा, अधर्म, अज्ञान यापासून समाज दूर राहिला. म्हणूनच शिवकल्याण म्हणतात, **'श्रीगीतालयाचे कपाट। उघडूनि मोकळी केली वाट ।।'** गीतेतील तत्त्वज्ञान सामान्यजनांपर्यंत मराठीतून पोचविण्याचा बंडखोरपणा श्रीज्ञानेश्वरांनी केला. विचारसौंदर्य व भाषासौंदर्य या दोन्ही दृष्टीने पाहिले असता ज्ञानेश्वरी अलौकिक आहे. काव्य व तत्त्वज्ञान यांचा समतोल ज्ञानेश्वरीत साधला आहे. सातशे वर्षांपूर्वीचा हा ग्रंथ असल्याने भाषा प्राचीन आहे, त्यामुळे ती अपरिचित वाटते.

प्राचार्य सोनोपंत दांडेकरांच्या शब्दात सांगायचे झाल्यास, 'ज्ञानेश्वरीत कर्म आहे; पण कर्माची कटकट नाही; ज्ञान आहे पण ज्ञानाचा रुक्षपणा नाही; भक्ती आहे; पण भोळ्या अज्ञानाची नाही.' ज्ञानेश्वरांनी तत्त्वज्ञानाला प्रेमाची माधुरी आणली व भक्तीला ज्ञानाचा डोळा दिला आहे. त्यांच्या दृष्टान्तातही कुटुंबाविषयी, पशुपक्ष्यांविषयी व चराचर

सृष्टीविषयी अतुल प्रेम आहे.

सुंदर शब्द, सुंदर विचार, सुंदर भावनांनी भरलेली, शब्दालंकार व अर्थालंकारांनी नटलेली, सजलेली अशी ही थोर कलाकृती ज्ञानेश्वरी! तिची ओळख करून घ्यायला तुम्हाला नक्कीच आवडेल !

□□□

प्रकरण
२

मावशी हवी पण -

****

संध्याकाळचे सात वाजले. कॉलनीतल्या मुलांची पावले कावळेकाकांच्या गच्चीकडे वळू लागली. रोज संध्याकाळी मुले गप्पागोष्टी करण्यासाठी काकांकडे जमत. (सरबत, ऊसाचा रस, भेळ, आईस्क्रीम हे ही अनेकदा मिळत असे!) कावळे–काका म्हणजे एक चालता–बोलता ज्ञानकोष होता. त्यामुळे त्यांच्या गप्पांमधून मुलांना ज्ञान व बोध दोन्ही मिळत असे. ह्यावर्षी काका मुलांना ज्ञानेश्वरीची ओळख करून देणार होते. ह्या मुलांमध्ये शर्वरी व सोहम् भारी चौकस होते. काका गच्चीत आल्याबरोबर शर्वरी म्हणाली–

शर्वरी – काका ! काका ! माझी आजी म्हणाली की मला अजून ज्ञानेश्वरी समजत नाही. ती तुम्हाला काय कप्पाळ समजणार?

सोहम् – होय काका, माझे आई–बाबा पण असंच म्हणाले.

काका – अरे, न समजायला काय झाले? मी सांगीन न समजावून. बरं तुम्ही मला आधी सांगा, तुम्हाला आई आवडते की मावशी?

सर्व मुले – आई, आई!

शर्वरी – काका, तुम्ही असं कसं विचारता? आई सर्वांना आवडणारच.

काका – ठीक आहे. पण मी तुम्हाला एक गंमत सांगतो. एकदा एका शाळेत इंग्रजी भाषा कशी शिकवायची यासंबंधी मार्गदर्शन करायला एक इंग्लिशबाई (मावशी) आल्या होत्या, दिवसभराचे कामकाज संपल्यावर नियोजकांनी त्या मावशींना कोकणच्या निसर्गरम्य वातावरणात फिरावयास नेले. त्यांच्या सोबत शाळेतील शिक्षिकाही होत्या. त्या इंग्लिशमावशींनी विचारले, 'मोगरा फुलला'– हा ज्ञानेश्वरांचा अभंग म्हणू शकाल का? एका बाईंनी अडखळत अडखळत अभंग म्हणण्याचा प्रयत्न केला! त्या इंग्लिश मावशींना मात्र 'मोगरा फुलला' व ज्ञानेश्वरांचे इतरही अभंग तोंडपाठ होते, आवडत होते! मराठी मातृभाषा असणाऱ्या शिक्षिकांना ते येत नव्हते!

शर्वरी – अय्या खरंच?

काका – होय. बाळांनो, श्रीज्ञानेश्वरांचा काळ लोटून सातशे वर्षे झाली. त्या काळची सामाजिक परिस्थिती व आजची सामाजिक परिस्थिती यात फार फरक आहे. त्या काळात धर्माचा जबरदस्त पगडा समाज व्यवस्थेवर, व्यक्तीवर होता. शिक्षणाच्या क्षेत्रात ब्राह्मणांची मक्तेदारी होती. वैदिकज्ञान सुसंस्कृत भाषेच्या पेटीत बंदिस्त होते. ज्ञानेश्वरांनी ही सर्व परिस्थिती झुगारून देण्याचे धारिष्ट्य दाखवले. वैदिक ज्ञान संस्कृत ऐवजी प्राकृत मराठी भाषेतून सामान्य जनांपर्यंत पोचवले. ज्ञानगंगा महाराष्ट्रातील प्रत्येकाच्या दाराशी आणून ठेवली. म्हणून मराठी भाषा

सांगते-

ज्ञानदेव बाळ माझा, सांगे गीता-भगवंता।

लक्ष द्या हो विनविते, 'मराठी' मी 'त्याची 'माता'।

ज्ञानेश्वरांनी श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील, उपनिषदातील तत्त्वज्ञान मराठी भाषेत आणून मराठी भाषेलाच पवित्र केले, समृद्ध केले. मग ही मराठी भाषा काळानुसार विकसत गेली. ज्ञानेश्वरांनंतर संत एकनाथ, नामदेव, तुकाराम, गोरोबा, चोखोबा, सेना, सावता, मुक्ताबाई, जनाबाई इत्यादी सर्वांनी काव्यरचना करून मराठी भाषेच्या समृद्धीत भर टाकली.

या संत कवीनंतर विद्वान असे पंत कवी उदयास आले. मोरोपंत, वामन पंडित, रघुनाथ पंडित ही नावे तुम्ही ऐकली असतीलच. त्यानंतर भारतात इंग्रजांची राजवट सुरू झाली. इंग्रजी शिक्षणाचा परिणाम मराठी भाषेवर झाला. मराठीचे रुप, चेहरा, मोहराच पालटला, मराठी भाषेचे अर्वाचीन युग सुरू झाले. बा. सी. मर्ढेकर, माधव ज्यूलियन, रे. टिळक, बालकवी, भा. रा. तांबे इत्यादींनी काव्याच्या क्षेत्रात नवे युग निर्माण केले. टिळक-आगरकर, चिपळूणकर इत्यादींनी भारदस्त मराठी साहित्य निर्माण केले. त्यानंतर खांडेकर, फडके यांनी कथा-कादंबऱ्यांद्वारे मराठी भाषेला नवा साज चढवला. आचार्य अत्रेंच्या लेखणीने मराठी भाषेला पाणीदार केले. ग. दी. माडगूळकर तर मराठीचे 'वाल्मिकी' म्हणून ओळखले जातात. वसंत बापट, बा. भ. बोरकर, कुसुमाग्रज, विंदा करंदीकर इत्यादींनी मराठी सारस्वतात मोलाची भर टाकली. पु. ल. देशपांडेसारखे नररत्न मराठी भाषेला लाभले. त्यांनी मराठी भाषेत विपुल साहित्य निर्माण केले. वसंत कानेटकर, जयवंत दळवी यांनी नाट्य क्षेत्रात भरीव कामगिरी केली. तसेच बहिणाबाई, इंदिरा संत, शांता शेळके इ. यांनाही विसरून चालणार नाही. आजचे मंगेश पाडगांवकर सर्वांना माहीत आहेतच. तसेच नारायण सुर्वेनाही विसरून चालणार नाही. आनंद यादव, दया पवार, सुरेश भट, कवी ग्रेस, ना. धों. महानोर, भीमराव पांचाळ इत्यादींनी मराठी भाषेला नवे रुप दिले आहे.



मराठी मुलानी या सगळ्या साहित्याची ओळख करून घ्यायला हवी. मग मी 'मराठी' आहे, मी 'मराठी' बोलतो याचा त्याला अभिमान वाटला पाहिजे. शालेय शिक्षण मराठीतून घ्यावं की इंग्रजीतून यासंबंधी मी काही बोलणार नाही. इंग्रजी भाषा शिकू नका, असेही माझे मत नाही; पण मला एवढेच म्हणायचे आहे की, मराठीतून बोलण्याचा कमीपणा वाटू देऊ नका. इंग्रजीतून बोलला की तो सुशिक्षित व मराठीतून बोलला की अडाणी, असा गैरसमजही नको. इंग्रजीयुक्त किंवा हिंदी मिश्र मराठी बोलण्यापेक्षा शुद्ध मराठी बोला, लिहा, शुद्ध उच्चारांकडे लक्ष द्या. शुद्धलेखनाकडे लक्ष द्या. इंग्रजी, हिंदी, बंगाली, कानडी, तेलगु या सर्व भाषा मराठी भाषेच्या भगिनी आहेत. त्यांचे व तुमचे नाते मावशीसारखे आहे. 'माय मरो, मावशी उरो' असा विचार करू नका. मावशी पण आईसारखीच असते. म्हणून मावशीही हवी पण आईकडे दुर्लक्ष नको. आईवर प्रेम करणे, आईची सेवा करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. ते

कर्तव्य पार पाडा. आपल्या मुलांनी आपल्याकडे पाठ फिरवली तर आईने कोणाकडे आशेनं पहायचे ? ज्ञानेश्वरांनी लावलेला हा मराठी भाषेचा वेल गगनावर गेला आहे, बहरून आला आहे. तिच्या फुलांचा सुगंध घेणार नं ?

सोहम् – हो काका. आम्ही पण आता मराठी पुस्तके वाचू.

शर्वरी – आम्ही मराठी गाणी ऐकू. मराठी कविता पाठ करू.

काका – शाब्बास ! मग काय म्हणायचे ?

शर्वरी – माय जगो व मावशी पण जगो !

सोहम् – मावशी हवी पण आईकडे दुर्लक्ष नको.

काका – बरोब्बर! चला पळा. जेवायची वेळ झाली.

□□□

प्रकरण ३

धन्य पुण्यशील अवतार हे!

****

सोहम् - काका, तुम्ही आम्हाला ज्ञानेश्वरीबद्दल सांगणार नं?

शर्वरी - काका, त्यापेक्षा ज्ञानेश्वरांबद्दल सांगा नं. काका खरंच का हो ज्ञानेश्वरांनी रेड्याच्या मुखातून वेद वदवले?

काका - हो. ते सर्व खरं आहे. थांबा, मी तुम्हाला हे सगळं सविस्तर सांगतो...

सर्व जगाला सन्मार्ग दाखवणाऱ्या ज्ञानेश्वरांचा जन्म शके ११९३ मध्ये श्रीक्षेत्र आळंदी येथे झाला. विठ्ठलपंत व रुक्मिणीबाई कुलकर्णी यांचे हे सुपुत्र होते. ते दोघेही भगवद्भक्त व सदाचारी होते. हे सदाचार संपन्न

घराणे मूळचे आपेगावचे होते.

विठ्ठलपंतांना लहान वयातच चार-शास्त्रांचे, वेद-उपनिषदे, व्याकरण, काव्य यांचे धडे मिळाले होते. विठ्ठलपंत प्रथमपासूनच विरागी वृत्तीचे होते. तीर्थाटनाचा त्यांना छंद होता. तीर्थाटन करत ते आळंदीला गेले असता ज्ञान-वैराग्य संपन्न, तेजस्वी विठ्ठलपंतांची भेट सिधोपंत कुलकर्णी यांच्याशी झाली. सिधोपंतानी विठ्ठलपंतांना आपला जावई करून घेतले. विठ्ठलपंत व रुक्मिणीबाई यांची काही वर्षे तीर्थाटनातच गेली. विठ्ठलपंतांचे मन संसारात रमेना. हरिकीर्तन, सत्संग, वैराग्य यांची त्यांना ओढ लागली. यात्रेच्या निमित्ताने विठ्ठलपंत काशीला गेले असताना तेथे त्यांनी श्रीपाद स्वामींकडून संन्यास दीक्षा घेतली. परंतु काही काळानंतर या संन्यास दीक्षेस पत्नीची संमती नाही असे समजताच गुरुंनीच विठ्ठलपंतांना परत गृहस्थाश्रम स्वीकारायला लावला. गुरुंची आज्ञा म्हणून विठ्ठलपंतांनी संसार सुरु केला. त्यांना श्रीनिवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई अशी चार अलौकिक अपत्ये झाली.

एकदा संन्यास स्वीकारल्यावर पुन: संसार करणे, गृहस्थाश्रम स्वीकारणे त्या काळच्या समाजरुढी व शास्त्राच्या विरुद्ध होते. त्यामुळे नातेवाईक, समाज बांधव यांच्याकडून त्यांची खूप अवहेलना झाली. ब्राह्मण समाजाने त्यांना वाळीत टाकले. गावाबाहेर एका पर्णकुटीत दारिद्र्य व दु:खात त्या पतीपत्नींनी बारा वर्षे काढली.

आपल्या मातापित्यांच्या बरोबर या भावंडांनी अनेक तीर्थक्षेत्रांना भेटी दिल्या. निवृत्तीनाथांनी त्र्यंबकेश्वर येथे जाऊन खडतर तपश्चर्या केली. लोकांच्या विरोधाने ही भावंडे खचली नाहीत. परंतु काही वर्षांनी ही भावंडे मौजीबंधनाच्या वयाची झाली. त्याकाळच्या धर्मशास्त्राप्रमाणे मुलांच्या मुंजी होणे आवश्यक होते. मुंजीमुळेच मुलांना अध्ययनाचा अधिकार प्राप्त होणार होता. त्यामुळे मुलांच्या मुंजी व्हाव्यात व शास्त्राप्रमाणे त्यांच्यावर संस्कार व्हावेत असे विठ्ठलपंतांनाही वाटत होते. त्यासाठी आळंदीच्या ब्राह्मणांना ते शरण गेले. ब्रह्मवृंदाची सभा बोलविण्यात आली.

या सभेत विठ्ठलपंतांनी विनंती केली, 'तुम्ही वेदांचे अधिकारी आहात. वेद शास्त्रानुसार सांगाल तो निर्णय मला मान्य आहे. मला शुद्ध करून घ्यावे. प्रायश्चित्त सांगावे.' ब्रह्मवृंदानी 'देहान्त प्रायश्चित्त' हा एकमेव उपाय सांगितला!

विठ्ठलपंतांनी हा उपाय आनंदाने मान्य केला. विठ्ठलपंतांची धर्मशास्त्रावर निष्ठा होतीच. आपल्या कर्माचा त्रास यापुढे मुलांना तरी होणार नाही म्हणून ब्रह्मवृंदाने दिलेली शिक्षा विठ्ठलपंत व लक्ष्मीबाई यांनी प्रत्यक्ष अमलात आणली. त्यांनी देहान्त प्रायश्चित्त घेतले किंवा उत्तर दिशेस प्रयागच्या दिशेने प्रयाण केले. पुन: परत न येण्यासाठी! या चार निष्पाप मुलांना पोरके करून ते कायमचे दूर निघून गेले! आता बालवयातील निवृत्तीनाथच त्यांचे माता-पिता-गुरू, चालक-पालक बनले!

पैठणहून मुंजीसाठी परवानगी किंवा शुद्धिपत्र आणावे असे विद्वान पंडितांनी सांगितल्यामुळे ही चार बालके पैठणला निघाली.

ती गोजिरवाणी मुले पोरकी चार।
चालली पैठणा करीत मुखाने गजर।।

मुळातच शुद्ध, पवित्र, निष्पाप असणाऱ्यांना कसले हो शुद्धिपत्र? आळंदीच्या ब्राह्मणांनी दिलेले पत्र या मुलांनी पैठणच्या ब्रह्मवृंदासमोर ठेवले; पण ही संन्याशाची मुले आहेत, हे समजल्यावर पैठणच्या ब्राह्मणांनी त्यांना शुद्धिपत्र देण्याचे नाकारले. त्यांची टिंगल-टवाळी, कुचेष्टा केली. तेथून एक पखालवाला रेड्यावर बसून चालला होता. तेव्हा एक टवाळखोर म्हणाला, 'या रेड्याचे नाव ही 'ज्ञाना' आहे.' ज्ञानेश्वर म्हणाले, 'आपण म्हणता ते खरे आहे. त्याच्यातही आत्मा आहे. माझ्यातही आत्मा आहे. त्याचा माझा आत्मा सारखाच आहे.' मग टवाळखोर म्हणाले, 'मग या रेड्याला आम्ही मारतो. त्याचे वळ तुझ्या पाठीवर उमटले पाहिजेत!' रेड्याच्या पाठीवर आसूड मारल्यावर त्याची वेदना ज्ञानेश्वरांना होऊ लागली. त्यांच्या पाठीवर वळ उमटू लागले! टवाळखोरांनी सांगितल्याप्रमाणे रेडा वेद बोलू लागला! नामदेव म्हणतात-

'काय सांगो देवा! ज्ञानोबाची ख्याती!
वेद म्हैशामुखे बोलविले।।'

हे सर्व चमत्कार पाहून सर्वांनी ज्ञानेश्वरांचे सामर्थ्य जाणले- लोक दिपून गेले. त्यांना शरण गेले. त्यांचा जयजयकार केला. या अलौकिक प्रसंगातून ज्ञानदेवांचे योगसामर्थ्य लोकांच्या समोर प्रगट झाले. या भव्य-दिव्य प्रकाराने लोकांची अंत:करणे हेलावली. ज्या ब्राह्मणांनी शुद्धिपत्राचा आग्रह धरला होता, ते सर्व या आगळ्या वेगळ्या प्रसंगाने भारावून गेले. पैठणच्या वेदोनारायणांनी ज्ञानदेवादि भावंडांना शुद्धिपत्र दिले!

लांब-लांब अंतरावरून या भावंडांना पाहण्यासाठी त्यांचे विचार ऐकण्यासाठी लोक येऊ लागले. ही चारही भावंडे मुळातच विरागी. त्यांना स्वंत:साठी काही नको होते. विठ्ठल-भक्तीचा प्रसार करीत यांचा प्रवास चालू होता. फिरत फिरत ही भावंडे 'नेवासे' या गावी पोहचली. 'नेवासे' म्हणजेच म्हाळसापूर. हे प्रसिद्ध ठिकाण आहे. भगवंतांनी येथे मोहिनीरुप धारण केले होते अशी कथा आहे. नेवाशाच्या मार्गावर निवृत्तीनाथ ज्ञानेश्वरांना म्हणाले, 'ज्ञानोबा, ही सिद्धी तू वापरू नकोस. त्या पेक्षा या अज्ञ लोकांना आपण ज्ञानमार्गावर आणूया. तू गीतेवर भाष्य कर. त्यांना गीतानंद दे. त्यामुळे त्यांच्या आयुष्याचा कायापालट होईल.'

श्रीनिवृत्तीनाथांच्या कृपेने शके १२१२ मध्ये ज्ञानेश्वरांनी गीतेवरील भाष्य-'ज्ञानेश्वरी' पूर्ण केली. या ग्रंथाला 'ज्ञानदेवी', 'ज्ञानेश्वरी', 'देशीकार लेणे' म्हणतात तर वारकरी पंथात 'पोथी' म्हणतात. ज्ञानदेव गीतेवर भाष्य करीत असताना सच्चिदानंदबाबा लेखनाचे कार्य करीत होते. याच तीर्थक्षेत्री निवृत्तीनाथांच्या आज्ञेवरून त्यांनी आपल्या मतप्रतिपादनार्थ अमृतानुभव हा अद्वितीय ग्रंथ लिहून पूर्ण केला. कित्येक शतके जगलेल्या व योगविद्येत पारंगत असलेल्या चांगदेवांना अंतर्मुख करण्यासाठी ज्ञानेश्वरांनी जे पासष्ट ओव्यांचे पत्र पाठवले ते 'चांगदेव पासष्टी' म्हणून प्रसिद्ध आहे.

यानंतर संत नामदेव आदी संतांबरोबर उत्तरभारत यात्रा केली,

तत्त्वचर्चा केली. याच काळात ज्ञानेश्वरांनी आपल्या अभंगांची रचना केली. ज्ञान व भक्ती यांचे योग्य मार्गदर्शन त्यांच्या अभंगातून दिसते. पंढरपूरच्या विठ्ठलभक्तांच्या मेळाव्यात त्यांनी ज्ञानेश्वरी चे तत्त्वज्ञान, त्यामागील भूमिका इ. चा परिचय करून दिला व भागवत धर्माच्या मंदिराची प्रस्थापना केली. **'ज्ञानदेवे रचिला पाया! उभारले देवालया।'** असे म्हणतात. सर्वांना सुलभ असा भक्तिमार्ग सांगितला.

एवढे कार्य केल्यावर त्यांना जाणवले की आपले जीवितकार्य, अवतारकार्य संपत आले. त्यामुळे त्यांनी समाधी घेण्याचे ठरवले. कार्तिक वद्य त्रयोदशी, शके १२१८ (इ. स. १२९६) मध्ये आळंदीला त्यांनी समाधी घेतली. ज्ञानेश्वरांना जाऊन सातशे वर्षे झाली तरी ज्ञानेश्वरीचे हृदयावरील राज्य, सत्ता, अधिकार, परिणाम नष्ट झाले नाहीत!

ज्ञानेश्वरानंतर थोड्याच दिवसात सोपानदेव यांनी, नंतर मुक्ताबाईने, नंतर निवृत्तीनाथांनी वेगवेगळ्या ठिकाणी समाधी घेतली. अशा प्रकारे ही चारही भावंडे आपल्या लहानशा आयुष्यात समाजाला सन्मार्ग दाखवून ईश्वररुप झाली!

सोहम् – काका, या चार भावंडांनी जीवनात किती त्रास सोसला, हाल काढले, पण लोकांना चांगला मार्ग दाखवला.

शर्वरी – काका, आता उद्यापासून ज्ञानेश्वरीबद्दल सांगाल नं?

काका – हो सांगणार नं; पण एवढेच म्हणतो आणि थांबतो.

धन्य यांचा जन्म धन्य यांचे कुळ।
धन्य पुण्यशील अवतार हे ॥

□□□

प्रकरण ४

देवा तूचि गणेशु

****

शर्वरी – काका, ज्ञानेश्वरी ऐकायला लोक यायचे ? कोण कोण यायचे ?

काका – रेड्याच्या तोंडून वेद वदविणाऱ्या व मृत जिवाला जिवंत करणाऱ्या ज्ञानेश्वरांबद्दल सर्वसामान्य माणसाच्या मनात आदर, पूज्यभाव व प्रेम निर्माण झाले होते. ज्ञानेश्वर प्रथम मराठीतून गीतेवर भाष्य करणार आहेत हे ऐकल्यावर तर लोकांनी खूप गर्दी केली. हा सिद्धपुरुष आहे. देवाचाच अवतार आहे, असा सर्वसामान्य श्रोत्यांचा विश्वास होता. परंतु वेदाध्ययन केलेल्या व संस्कृत भाषेचा अभिमान असणाऱ्या ब्राह्मणवर्गाला ज्ञानेश्वरांच्या कर्तृत्वाची अजून

ओळख व्हायची होती. गच्च भरलेल्या मंदिरात एका बाजूला ब्राह्मण मंडळी बसली होती.

प्रवरानदीच्या काठावरील मोहिनीराजाच्या सुंदर मंदिरात ज्ञानदेवांनी प्रवेश केला. ज्ञानदेव एका खांबाला टेकून बसले. गीतेवर मस्तक टेकवले. समोर सद्गुरु निवृत्तीनाथ बसले होते. ज्ञानदेव उठले व सदगुरुंना साष्टांग नमस्कार घातला. सर्व श्रोत्यांना प्रेमभराने नमस्कार केला. डोळे मिटले, आणि ज्ञानदेवांचा ॐकार मंदिरात घुमला, ज्ञानेश्वरांच्या अमृतवाणीतून शब्द बाहेर पडले-

ॐनमो जी आद्या। वेदप्रतिपाद्या।
जयजय स्वसंवेद्या। आत्मरुपा।।

परब्रह्म परमात्म्याचा निर्देश ओंकाराने केला जातो. हे ओंकारस्वरुपा! वेदांनी ज्याचे प्रतिपादन करण्याचा प्रयत्न केला, त्या तुझ्या आद्य रुपास नमस्कार असो. केवळ स्वानुभवानेच ज्याचे ज्ञान होऊ शकते अशा आत्मस्वरुपाचा जयजयकार असो. या ओवीद्वारे ज्ञानदेवांनी वेद-विद्येला वंदन केले आहे, आणि जे ग्रंथात-ज्ञानेश्वरीत सांगणार आहेत ते वेदसंमत असून वेदमार्गाहून भिन्न नाही हे ज्ञानदेव येथे सूचित करतात, ॐकार ऐकल्याबरोबर ब्रह्मवृंद चमकला. कारण वेदसंस्कृती ही भारतीय संस्कारांची आद्य संस्कृती. चारही वेदांचा प्रतिपाद्य विषय म्हणजे आत्मरुप. या निमित्ताने ज्ञानदेवांनी पहिल्याच ओवीमधून आपल्या भाष्याची दिशा निश्चित केली.

सोहम् - काका, ज्ञानेश्वरांनी गीतेचे भाषांतर केले?

काका - नाही. ज्ञानेश्वरी हा 'भावार्थ दीपिका' आहे. मूळ भगवद्गीतेतील अर्थ ज्ञानेश्वरांनी त्यांच्या शैलीने, श्रोत्यांना समजेल अशा पद्धतीने सांगितला आहे. भगवद्गीतेत फक्त सातशे श्लोक आहेत. तर ज्ञानेश्वरीत नऊ हजार ओव्या आहेत. ज्ञानेश्वरीद्वारे ज्ञानेश्वरांनी सद्गुरुंशी, श्रोत्यांशी संवाद साधला आहे. मराठी भाषेचे सामर्थ्य दाखवले आहे. नमने, गीता, व्यास यांची स्तुती, श्रीकृष्ण-अर्जुन यांचे प्रेम-भक्ती इ.

अनेक विषय हाताळले आहेत. ज्ञानेश्वरी शांत रसाने, उपमा दृष्टान्त व रसाळ, मधुर भाषेने सजली आहे.



मंदिरात प्रवेश केल्यावर प्रथम गणेशाला वंदन करण्याचा प्रघात आहे. म्हणून व्यापक परमतत्त्वाला वंदन केल्यानंतर ज्ञानेश्वर श्रीगणेशाकडे वळले. ते म्हणतात–

देवा तूचि गणेशु । सकलार्थमति प्रकाशु।
म्हणे निवृत्तिदासु। अवधारिजो जी।।

मागच्या ओवीत वर्णन केलेल्या परब्रह्माचे स्वरुप ज्ञानेश्वरांनी श्रीगणेशामध्ये पाहिले. त्यांचा हा गणेश ॐकार रुप आहे. ते म्हणतात– तूच प्रत्यक्ष गणेशरूप आहेस. सर्व विद्यांचा तू अधिपती असल्या कारणाने त्यातील विविध अर्थांचा प्रकाश तुझ्यामुळेच पडला आहे. ज्ञानेश्वरांनी अक्षर गणेशाची पूजा ज्ञानेश्वरीच्या सुरुवातीलाच मोठ्या भक्तीने व प्रेमाने केली. गणेश वंदनाच्या निमित्ताने श्रोत्यांना सर्व वैदिक वाङ्मयाचे, ग्रंथांचे दर्शन घडवले. गणेश वंदनाच्या पंधरावीस ओव्या आहेत, 'सकलार्थमतिप्रकाशु' म्हणजे सर्व प्राणिमात्रांच्या बुद्धितला प्रकाश तेवत

राहू दे. गीतेतील गूढार्थ सर्वांना नीट कळू दे. ज्ञानदेवांची ही अक्षरगणेश पूजा पारंपारिक पद्धतीची नसून ज्ञानग्रंथांचा आढावा घेणारी सुंदर साखळी आहे. 'अकार' म्हणजे चरणद्वय, 'उकार' म्हणजे विशाल उदर आणि 'मकार' म्हणजे मस्तक असे हे रुपक आहे.

परब्रह्म म्हणून ओंकारास व शब्दब्रह्म म्हणून श्रीगणरायांचे स्मरण केल्यावर ज्ञानदेव शारदादेवीला वंदन करतात. ते म्हणतात-

आता अभिनव वाग्विलासिनी।
जी चातुर्य कलाकामिनी।
ते शारदा विश्वमोहिनी।
नमिली मियां।।

प्रतिभेची देवी शारदा किंवा सरस्वती ही नवनवीन वाङ्मय निर्माण करणारी आहे. ती नित्य नव्या नखऱ्यांनी व विलासांनी रसिकांना मोहून टाकते. अनेक कला-कौशल्यांचे सौंदर्य प्रकट करणारी म्हणून चातुर्य कलाकामिनी. हिची मोहिनी संपूर्ण विश्वभर पसरलेली आहे, अशा विश्वमोहिनी ज्ञानमातेला मी वंदन करतो असे ज्ञानेश्वर म्हणतात.

शर्वरी- आम्ही शारदापूजनाला हीच ओवी म्हणतो; पण तिचा अर्थ मला समजला.

काका - चला आता थांबू या, उद्या या.

□□□

प्रकरण ५

आपला निजधर्मु पाही

****

सोहम् – काका, ज्ञानेश्वरीत ज्ञानेश्वरांनी काय लिहिले आहे?

काका – आपले गुरू, आजोबा, काका, बंधू, मित्र आपल्या समोर युद्धाला उभे असलेले पाहून अर्जुनाच्या मनातील वीरवृत्ती नाहीशी होऊन त्याच्या मनात दया, दुःख, करुणा, निराशा निर्माण झाली. त्याचे गांडीव धनुष्य गळून पडले. अशा विकल अर्जुनाला उपदेश करून श्रीकृष्णाने युद्धासाठी प्रवृत्त केले आहे. उपदेश करताना संन्यास मार्ग, कर्ममार्ग, योगमार्ग, ज्ञानमार्ग, व्यक्तिमार्ग भगवंतांनी अर्जुनाला सांगितला आहे.

श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात, वर्णानुसार प्रत्येकाचा धर्म ठरला आहे. तू क्षत्रिय आहेस. क्षत्रियांना जगात युद्धासारखे योग्य कर्म दुसरे नाही. त्यामुळे यावेळी तुझ्या मनात दया-करुणा उत्पन्न होणे हे पूर्णपणे अयोग्य आहे. हे पटवून देण्यासाठी ज्ञानेश्वर एक दृष्टान्त देतात. गायीचे दूध कितीही उत्कृष्ट असले तरी नवज्वरांच्या रोग्याला दिले तर ते जसे मारक होते, तसे दया-करुणा हे ब्राह्मणांचे गुण क्षत्रियाने युद्धाच्या वेळी अंगिकारले तर त्याचा संपूर्ण नाश होईल.

येथे अर्जुन हा संपूर्ण मानवजातीचा प्रतिनिधी आहे. कुटुंबात, समाजात, धर्मात, राजकारणात प्रत्येकाला स्वधर्म ठरलेला असतो. भारतीय संस्कृतीत त्यासाठी चार वर्णांची निर्मिती झाली आहे.

ज्ञानेश्वरांच्या काळात यज्ञसंस्थेचे महत्त्व कमी झाले होते. परंतु वैदिक धर्मात, कर्मकांडाचे महत्त्व वाढले होते. म्हणून ज्ञानेश्वरांनी **'स्वधर्म जो बाणा। तोचि नित्ययज्ञु जाण पा।'** हा विचार दिला, 'स्वधर्म', म्हणजे ज्ञानेश्वरांना 'विहित कर्म' उचित कर्म असा अर्थ अपेक्षित आहे. तुमच्या वर्णानुसार असलेल्या कर्माचे आचरण करा. त्यासाठी व्रते, तपे, नियम करण्याची गरज नाही, शरीराला पीडा देण्याची गरज नाही, दूर कोठे तीर्थयात्रेला जाण्याची गरज नाही, उपास-तापास करण्याची गरज नाही, कठोर साधना, कामयुक्त आराधना नकोत, मंत्रतंत्र, अनुष्ठाने नकोत, स्वधर्म सोडून अन्य देवतांना भजण्याचीही गरज नाही. स्वधर्म कार्यामध्ये ज्ञानदेवांनी, अग्निमुखी हवन, देवपूजन, ब्राह्मण भोजन, गुरुभक्ती, अतिथी-सत्कार, ज्ञातीबांधवांचा संतोष यांचा समावेश केला आहे. स्वधर्म करा. त्यापासून धन मिळवा व त्याचा विनियोग स्वधर्माकडेच करा. शिल्लक राहिलेले आनंदाने सेवन करा.

ज्ञानेश्वरकाळातील यज्ञसंस्था समाजविन्मुख झाली होती. परंतु तिला 'स्वधर्म' भावनेची जोड मिळताच ती समाजसन्मुख झाली. तिने समकाळाशी सर्वकालीन जीवनाशी नाते जोडले. ती विश्वव्यापक बनली. यज्ञाचे आचारधर्मात रुपांतर झाले. यज्ञसंस्थेचे कर्मकांडात रुपांतर होताच

ती उच्चवर्णीय पुरोहितांचीच मिरासदारी झाली होती. त्यामुळे तिचे सर्वांगीण व सर्वस्तरातील लोकांशी, जीवनाशी नाते तुटले होते. परंतु ज्ञानेश्वरांनी यज्ञाच्या जागी 'विहित' 'उचित' असा स्वधर्म सांगितला. त्यामुळे गीतेच्या अर्थात नवीन भर पडली.

ज्ञानेश्वर येथे कामाचे म्हणजे कर्माचेच महत्त्व सांगतात. आपल्या जाती, धर्म, वर्णानुसार किंवा आपला जो नित्य व्यवसाय असेल तोच नेटाने, सचोटीने करावा हे त्यांचे सांगणे आहे. कोणतेही काम हलके 'भारी' असे नसते. अगदी रस्ते झाडणे हे ही हलके काम नाही. (गांधीजी, सानेगुरुजी यांनी भंग्याचेही काम करण्यात कमीपणा मानला नाही.) आपल्या कर्मातून समाजाची सेवाच होत असते. परमेश्वर समाजातच असतो. 'नित्यकर्म' हीच भगवंताची पूजा. आपल्याला माहीत आहे की, संत; वाणी, कुंभार-चांभार, माळी, शिंपी होते. त्यांनी त्यांच्या कामातच देव पाहिला. सावतामाळी म्हणतात, **'कांदा, मुळाभाजी। अवघि विठाबाई माझी।'** त्यांनी त्यांच्या नित्य व्यवसायात परमेश्वर पाहिला. तीच त्यांची परमेश्वराची उपासना ठरली. हेच स्वधर्म आचरण! हाच नित्य यज्ञ!

काका - तुम्ही सांगा बरं तुमचा स्वधर्म कोणता?

शर्वरी - अभ्यास करणे, आईवडिलांचे ऐकणे.

काका - पळा आता. आई जेवायला बोलावते आहे. पळा!

□□□

प्रकरण ६

येणे उपाये योगारूढ

****

सोहम् – काका तुम्ही तासन् तास मांडी घालून कसे बसू शकता?

शर्वरी – अरे काका योगासने करतात, म्हणून.

सोहम् – आमच्या तर पायाला मुंग्या येतात. आम्ही सारख्या मांड्या बदलत असतो.

काका – अरे, ज्ञानेश्वरीत पण योगाभ्यास ज्ञानेश्वरांनी सविस्तरपणे सांगितला आहे. त्याचीच आज माहिती देतो.

मी योगाभ्यास शरीर चांगले राहाते म्हणून करतो. पण योगाभ्यासाद्वारे परमेश्वराला प्राप्त करण्याचा प्रयत्न केला जायचा. निवृत्तीनाथ,

ज्ञानेश्वर हे खरोखरच योगी होते. म्हणूनच शारीरिक कष्ट, हाल–अपेष्टा ते सहन करू शकले. असो.

ज्ञानेश्वर सांगतात, योगशास्त्राचा अभ्यास करायचा असेल तर त्यासाठी योग्य अशी जागा पाहिजे. ती जागा शांत, निवांत व रम्य हवी. तेथे सहज बसले तरी तेथून हालूच नये असे वाटावे. ज्या ठिकाणी पूर्वी संतांनी वास्तव्य केले आहे, अशी जागा असावी. तेथील वातावरण इतके शांत व पवित्र असावे की नास्तिकालाही तपश्चर्या करण्याची इच्छा झाली पाहिजे. अशा ठिकाणी आसन दृढ करून योगाभ्यासाला प्रारंभ करावा. आसन कसे तयार करावे, आसनाची लांबी, रुंदी, उंची याबाबतही ज्ञानेश्वरांनी मार्गदर्शन केले आहे. आसनाची उंची सोयिस्कर असावी. आसन स्थिर, बळकट व सुखकारक असावे. अशा आसनावर बसून मन एकाग्र करून योगाचा अनुभव घ्यावा.

नंतर ज्ञानेश्वरांनी पद्मासन, भद्रासन, मूळबंध आसन, जालंधरबंध, ओढियाणबंध इ. आसने कशी करावीत हे सांगितले आहे. शेवटी कुंडलिनीशक्ती कशी जागृत करावी हेही ज्ञानेश्वर सांगतात.

जो जिभेचे चोचले पुरवतो, झोपेच्या आहारी जातो, तो योगाभ्यास शिकू शकत नाही.

सोहम् – माझा चुलतभाऊ बटाट्याच्या भाजीशिवाय दुसरी कोणतीच भाजी खात नाही.

शर्वरी – माझी आत्या रात्री टी. व्ही. पाहते व सकाळी नऊ वाजल्याशिवाय उठतच नाही. आई तिला काही बोलत नाही. आम्हाला मात्र सुट्टी असली तरी सातच्या पुढे झोपू देत नाही!

काका – अग, तेच बरोबर आहे. माणसाने सर्व क्रिया नियमाच्या मापाने आचाराव्यात. म्हणजे अतिखादाडपणा नको तसे उपास–तापास पण नकोत. अति झोप नको तसे जागरणही नको. एवढेच नव्हे तर बोलावे कसे, चालावे कसे याचेही ज्ञानेश्वर मार्गदर्शन करतात.

मपितला बोली बोलिजे। मितला पाउली चालिजे।
निद्रेही मानु दीजे। अवसरे एके।। (६-३५० ज्ञा.)

मोजकेच शब्द बोलावेत. फार बडबड करू नये. बेताच्या पावलांनी चालावे. पायाचा आवाज करत पाय आपटत चालू नये. ठराविक वेळी निद्रेलाही मान द्यावा. अशा नियमितपणे वागण्याने शरीरातील धातू सम प्रमाणात राहतात. त्यामुळे आरोग्य चांगले राहते. बाह्य इंद्रियांना नियमित आहार-विहाराची सवय झाली, वळण पडले की मनाची प्रसन्नता, समाधान, सुख यात वाढ होते. योगाभ्यासाचा त्रास वाटत नाही. सहजच योगाभ्यास होतो. योग साधनेने योग्याचे शरीर तेजस्वी, कांतिमान होते. वृत्ती शांत बनते. योगी आनंदी, सुखी व संतोषी असतो.

सोहम् - म्हणजे ज्ञानेश्वरांनी बसावं कसं, झोपावं किती, खावं किती, बोलावं कसं सर्वच सांगितलं आहे.

शर्वरी - अरे, आपले आई-बाबा नाही का आपल्याला सारखं सांगत असतात- 'ताठ बस, ताठ बस' म्हणून.

काका - बरोबर आहे. ताठ बसलं तरच मेंदूपर्यंत रक्तप्रवाह जाऊन पोचतो. मनाची एकाग्रता होते. विषय लक्षात येतो व लक्षात राहतो. पण स्वत: हे केलं पाहिजे. मी आसन करून तुम्ही बलवान होणार नाही. कारण प्रगती स्वत:ची स्वत:च करावी लागते. आपणच आपले मित्र किंवा शत्रू असतो. हे पटवून देण्यासाठी ज्ञानेश्वरांनी नलिकाबद्ध शुकाचा दृष्टान्त दिला आहे. ज्ञानेश्वर म्हणतात-

जैशी ते शुकाचेनि आंगभारे।
नळिका भोविन्नली एरी मोहरे।
तरी तेणे उडावे परि न पुरे। मनशंका।। (ज्ञाने. ६-७६)

पारधी पोपटाला पकडण्यासाठी एका नळीत दोरी ओवून त्याची दोन्ही टोके दोन्ही बाजूला बांधतो. पोपट त्या नळीवर बसला की त्याच्या शरीराच्या ओझ्यानं ती पोकळ नळी एका बाजूला फिरते. त्यावेळी पोपटाने उडून जावे हे योग्यच आहे. परंतु तो उडत नाही. नळी सोडल्यास आपण

खाली पडू अशी भीतीयुक्त शंका त्याच्या मनात येते. मग तो उगीचच मान वाकडी करतो. छाती आत घेऊन नळीला आवळून धरतो. चोचीनं नळी धरून ठेवतो. मग मनात मी बांधला गेलो आहे, या भ्रामक कल्पनेमध्ये सापडतो. मोकळा असलेल्या पायाचा चवडा या नळीमध्ये अधिकच गुंतवून ठेवतो. अशा प्रकारे कारणावाचून संकटात पडलेल्याला दुसरी कोणी व्यक्ती का बांधते? तो स्वत:च संकटात बांधून घेतो. मग तो अर्धा कापून नेला तरी नळी सोडत नाही.

बाळांनो, जीवनात समस्या असतात, संकटे असतात, पेच-प्रसंग असतात त्यांना डगमगून चालणार नाही, भिऊन चालणार नाही. शांतपणे त्यातून मार्ग शोधला पाहिजे. योग्य प्रयत्न व उपाय केले पाहिजेत. त्यात अडकून न पडता स्वत:ची सुटका करून घेतली पाहिजे.

शर्वरी – काका, आजकाल विद्यार्थी पेपर अवघड जाईल म्हणून परीक्षेला बसत नाहीत किंवा नापास होऊ या भीतीने आत्महत्या करतात.

सोहम् – पण ते पास झालेले असतात!

काका – योगाभ्यासाने मनाची चंचलता कमी होते.

सोहम् – म्हणूनच आमच्या शाळेच्या वेळापत्रकातही योगाभ्यासाचा समावेश केला आहे. या तासानंतर शिकवलेला विषय चांगला समजतो. डोकं शांत राहतं. अभ्यास चांगला होतो.

काका – चला आता, उद्या आपण तुमच्या अभ्यासाबद्दल बोलू या.

□□□

प्रकरण ७

ते ज्ञान पै गा बरवे

****

काका – ज्ञानेश्वर सांगतात– ज्ञानासारखी पवित्र वस्तू नाही. ज्ञानच एकटे उत्तम आहे. वेदांमध्ये अनेक यज्ञ सांगितले आहेत. पण ज्ञानयज्ञापुढे सर्व यज्ञ फिके ठरतात, सूर्यासमोर ताऱ्यांचे तेज दिसत नाही तसे ज्ञानयज्ञापुढे इतर सर्व यज्ञ निस्तेज ठरतात. ज्ञानामुळे माणसात विवेक निर्माण होतो. वृत्ती शांत व समाधानी बनते.

शर्वरी – ज्ञानेश्वरांनी कोणत्या विषयाचे ज्ञान सांगितले आहे?

सोहम् – त्यावेळी ज्ञान घेण्यासाठी गुरुंकडे जावे लागत असे नं?

काका – हो! हो! सगळं सांगतो. ज्ञानेश्वरीत सांगितलेले ज्ञान म्हणजे परमेश्वराविषयीचे ज्ञान. ज्ञान कसे ग्रहण करावे हेही ज्ञानेश्वर सांगतात.

ज्ञान जेथे नसते तेथे संशय असतो. अज्ञान असते. अज्ञानाने संशय वाढतो व तो बुद्धीला ग्रासून टाकतो. बुद्धी भ्रष्ट करतो. परंतु ज्ञानाच्या शस्त्राने संशयाचा नाश करता येतो. मनाचा मळ, वाईट विचार ज्ञानाने नष्ट होतात. मन शांत, तृप्त होते. उत्तम ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी गुरु हवा. गुरू म्हणजे साक्षात ज्ञानालय. ज्ञान ज्ञानी संतही देऊ शकतात. परंतु या गुरुंबद्दल मनात आदर हवा, श्रद्धा हवी. गुरुंना मनापासून वंदन करावे. शक्य असल्यास त्यांची सेवा करावी. मनातील अहंकार, गर्व, ताठा दूर करून निराभिमानी अंत:करणाने गुरुंशी मोकळेपणाने बोलावे. ज्ञान मिळविण्याची इच्छा, श्रद्धा व नम्रता हवी. अहंकार, संशय नको. तरच ज्ञान प्राप्त होते.

शर्वरी – त्याकाळी गुरुंना फी वगैरे द्यावी लागत नसे नं ?

काका – छे! त्या काळी पैशानं ज्ञान विकत घेता येत नव्हते. मनुस्मृतीत तर एक मजेदार गोष्ट आहे. बारा वर्षे गुरुगृही राहून पशूचा मनुष्य झाल्यावर शिष्याने गुरुला काय द्यावे?



मनू सांगतात, 'दे एखादे फूल, एखादा पंखा, एखादा खडावांचा जोड, एखादा पाण्याने भरलेला कलश! अरे ही थट्टा नाही. कारण जे द्यायचे ते श्रद्धेचे चिन्ह म्हणून द्यायचे. फुलाला किंमत नाही, वजन नाही. परंतु त्या मागील भक्तीला भावनेला मोठी किंमत असते.

ज्ञानेश्वर ज्ञानाचे जीवनातील महत्त्व सांगतात. ते म्हणतात, ज्या व्यक्तीच्या ठिकाणी ज्ञानाची आवड नाही, त्याचे जिवंत राहणे म्हणजे काय? त्यापेक्षा मरण बरे. ज्ञानाशिवाय माणूस म्हणजे निर्मनुष्य घर, किंवा प्राणहिन शरीर. ज्ञान प्राप्त व्हावे अशी मनात इच्छा असली की ज्ञान प्राप्त होते. अभ्यासातून ज्ञान मिळते.

अभ्यासयोगाने काय प्राप्त होत नाही? अभ्यासाच्या सामर्थ्याने कित्येकांनी तर आकाशात फिरण्याची गती साध्य केली असून, कित्येकांनी वाघ-साप आदी क्रूर प्राण्यांना स्वाधीन करून घेतले आहे. या अभ्यासाच्या योगाने विष सुद्धा पचनी पडते. समुद्रातही पायवाट प्राप्त होते. कित्येकांनी अभ्यासाने वेदही मुखोद्‌गत केले आहेत. अभ्यासयोगाला कोणतीही गोष्ट मुळीच अवघड नाही.

सोहम् - काका, पण अभ्यास म्हणजे नेमकं काय?

काका - वा! छान प्रश्न विचारलास. जे गुरूंनी तुम्हाला शिकवले ते एकदा शिकले की कायमचे लक्षात राहत नाही. विसरते. मग ते विसरले जाऊ नये म्हणून किंवा ते ज्ञान कायम लक्षात ठेवण्यासाठी मानसिक, बौद्धिक, तार्किक, शारीरिक सराव, म्हणजे अभ्यास. पतंजलीने 'अभ्यास म्हणजे, अभि+आस- प्रकर्षाने होत आहे' अशी व्याख्या केली आहे. आजकाल तुम्ही विद्यार्थी शिकवलेले आठवून बघत नाही, शिकवलेल्या ज्ञानाचा उपयोग व्यवहारात, त्या विषयाच्या संदर्भात करत नाही, सराव करत नाही, मग परीक्षा आली की ताण-तणावामुळे काहीच लक्षात राहत नाही किंवा अभ्यास होत नाही. आत्मविश्वास नाहीसा होतो. मग कमी गुण मिळण्याची भीती. किंवा नापासाची भीती, किंवा शेवटी अपयश! तो धक्का सहन न झाल्याने आत्महत्या! गुरूंनी जी पाऊलवाट

दाखविलेली असते ती नुसती पाहून लक्षात राहत नाही. त्या वाटेने रोज गेले पाहिजे, वारंवार गेले पाहिजे. मग त्या वाटेवर आपले मन रुळेल, ती वाट सवयीची होईल. मग त्या वाटेने परीक्षेचा डोंगर सहज चढून जाता येईल.

ज्ञानेश्वरीत अभ्यास → ज्ञान → ध्यान → कर्मफलत्याग हा परमेश्वरप्राप्तीचा मार्ग सांगितला आहे आपण आपल्या जीवनातही ह्या मार्गाने जाऊन यशस्वी होऊ शकतो. गुरू जे काही शिकवतात ते एकाग्रतेने ग्रहण करावे व मग शिकवलेले आत्मसात करावे. गणित, कला–क्रीडा यांमध्ये सराव महत्त्वाचा. भाषा–विज्ञान यांचा दैनंदिन जीवनात उपयोग महत्त्वाचा. मग ज्ञान प्राप्त होईल. प्राप्त झालेल्या ज्ञानासंबंधी विचार, चिंतन–मनन–स्मरण केले पाहिजे. म्हणजे ऐनवेळी विस्मरण होत नाही. एकदा परीक्षा दिली की एवढेच गुण मिळाले पाहिजे वगैरे काही अपेक्षा ठेवू नये. जे काही यश मिळेल ते आनंदाने स्वीकारावे.

सोहम् – मागच्या वर्षी आमच्या शेजारच्या मुलाला ९२ टक्के मार्क मिळाले. पण या मार्कांवर मेडिकलला प्रवेश मिळेल की नाही? जवळचे कॉलेज मिळेल की नाही या काळजीने सर्वांचे चेहरे उतरले होते. आम्हाला वाटले त्यांचा मुलगा नापासच झाला!

काका – कोणतीही गोष्ट साध्य होण्यासाठी पाच कारणे असतात; पण ती उद्या सांगतो.

□□□

प्रकरण ८

पाचेचि इही कारणे

****

सोहम् - काका, सचिन तेंडुलकर राजकारणात जाणार ?

शर्वरी - तो राजकारणात जाओ की अर्थकारणात जाओ, त्याची शतकांची सेंच्युरी एकदा पूर्ण झाली.

काका - तेच मी सांगतो आहे. की एखादे काम पूर्ण होण्यासाठी त्यामागे पाच कारणे असतात.

सोहम् - कोणती ?

काका - ती कारणे म्हणजे -

१) देह २) कर्ता ३) इंद्रिये
४) वायुशक्तीचे व्यापार ५) देववृंद.

शर्वरी – म्हणजे काय ? आम्हाला सोपं करून सांगा.

काका – कर्म साध्य होण्याचं पहिलं कारण म्हणजे देह किंवा शरीर, यालाच अधिष्ठान असे म्हणतात. इच्छा–द्वेष, सुख–दु:ख, ज्ञान व्यक्त करण्याचे, निर्माण करण्याचे, ग्रहण करण्याचे एकमेव आश्रयस्थान शरीर आहे म्हणून त्याला अधिष्ठान म्हटले आहे. उन्हाच्या झळा शरीरच सोसते व वाऱ्याचा थंडावा शरीरालाच मिळतो. अशा प्रकारे सुखदु:खाचा उपभोग शरीरच घेते. जागे राहणे, स्वप्न पाहणे, झोपणे या तीन अवस्था शरीरातच निर्माण होतात. म्हणून शरीर हे अधिष्ठान.

सध्या युवराजसिंग खेळू शकत नाही. कारण काय तर त्याचे शरीर त्याला साथ देत नाही. उत्तम धावपटू असेल, पण त्याचा पाय मोडला तर तो धावू शकेल का?

सोहम् – काका, सचिनचा पण 'टेनिस एल्बो' की काय ते दुखावले होते ते!

काका – बरोबर! म्हणूनच तो आता पूर्वीसारखे फटके मारू शकत नाही. असो!

दुसरे कारण म्हणजे कर्ता – प्रत्येक कामामध्ये व उपभोगामध्ये तो असतो. उदाहरणार्थ 'मी पास झालो, मी आंबे आणले, मी श्रीखंड खाल्लं' असं आपण म्हणतो. हा 'मी' म्हणजे अभिमानी अहंकार म्हणजेच जीव किंवा चैतन्य. त्याला कर्ता म्हणतात. शरीर सुंदर आहे. सुदृढ आहे. पण त्यात जीवच नसेल, चैतन्य नसेल तर काय उपयोग?

तिसरे कारण म्हणजे इंद्रिये. यात ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रिये यांचा समावेश होतो. यांच्याद्वारा ज्ञानकर्म व क्रियाकर्म अशी दोन कर्मे होतात. डोळ्यांनी पाहणे, कानांनी ऐकणे, पायाने चालणे, वाणीने बोलणे इ. क्रियाकर्मे होत. हे सर्व इंद्रियांचे व्यापार–क्रिया, किंवा प्रत्येक इंद्रियाचा व्यापार–क्रियाकर्म वायूच्या क्रियाशक्तीमुळे होतात, ही वायूची क्रियाशक्ती मुळात एकच आहे. पण शरीरातील भिन्न स्थानामुळे तिचे स्वरुप व नाव वेगळे आहे. सर्व कर्मेंद्रियाच्या व प्राणापानादिकांच्या व्यापारांच्या मार्गाने

भिन्न झालेली वायुशक्ती हे कर्माचे चवथे कारण आहे. प्राणवायूच्या ठिकाणी नाश न पावणारी अखंड क्रियाशक्ती आहे. ते सामर्थ्य वाणीच्या-वाचेच्या ठिकाणी आले की बोलणे घडते. हातात आले की देणेघेण होते, पायात आले की चालणे होते. ज्ञानेश्वरी सांगताना ही शक्ती ज्ञानेश्वरांच्या वाणीच्या ठिकाणी प्रकट झाली म्हणून ते ज्ञानेश्वरी सांगू शकले किंवा भगवद्गीतेवर भाष्य करू शकले.

पाचवे कारण 'दैव', देववृंद. सर्व इंद्रियांना प्रेरणा देणारी त्यांच्या व्यापारांचे, कार्याचे नियमन करणारी एक देवता त्यांच्या पाठीशी असते. कर्म यशस्वी होण्यासाठी इंद्रियांच्या अधिष्ठात्री देवतेच्या समुदायाची अनुकूलता हवी. डोळे आदि इंद्रियांच्या कार्यामागे सूर्यादि देवतांचा समुदाय असतो. त्यांची कृपा हवी. तर वाणी देवता अग्नी आहे, वाचा-प्राण देवता असे म्हणतात. या सर्व शक्ती सुदृढ ठेवणे, इंद्रियांची काळजी घेणे, आपली जबाबदारी आहे.

सर्वसामान्यपणे कार्य यशस्वी व्हायचे पाचवे कारण म्हणजे दैव अशी गैरसमजूत आहे. कारण भगवद्गीतेत म्हटले आहे 'दैवं चैवात्र पञ्चमम्।' परंतु हे दैव म्हणजे नशीब किंवा प्रारब्ध नव्हे. दैव म्हणजे मनुष्याच्या अंत:करणातील शुभ अशुभ संस्कार असाही अर्थ घेतात. आपण जे वाचन करतो, विचार ऐकतो, सभोवताली घडताना बघतो. त्याप्रमाणे संस्कार होतात, त्याप्रमाणे कर्म करण्याची प्रेरणा मिळते. जिजाबाईने शिवाजी महाराजांना लहानपणी राम-कृष्ण यांच्या पराक्रमाच्या गोष्टी सांगितल्या म्हणून त्यांना पराक्रम करण्याची प्रेरणा मिळाली. एखाद्या भिकारणीने आपल्या मुलाला रस्त्यावर पडलेली वस्तू उचलायची शिकवण दिली असेल तर ते मूल तशीच कृती करणार. पूर्वजन्मकृत कार्याला दैव म्हणतात.


एखादी शस्त्रक्रिया करायची असेल तर डॉक्टर आपली शस्त्रक्रियेची साधने स्वच्छ, निर्जंतुक करून ठेवतो. त्याप्रमाणे शरीर, इंद्रिये इ. आपली उपकरणे, काम करण्याची साधने आपण नीट ठेवली पाहिजेत. कार्यक्षम

ठेवली पाहिजेत. त्यांची निगा राखली पाहिजे. काळ व काम यांचा सुयोग्य मेळ घातला पाहिजे. त्यांचे नियोजन, समायोजन हवे. नाहीतर For want of nail the battle was lost ! असे घडायचे. घोड्याची नाल नव्हती. ती बसवायची राहिली. त्यामुळे घोड्याची पावले हवी तशी, योग्य मार्गाने, दिशेने पडली नाहीत, वाकडी पडली. परिणाम काय झाला? युद्धात पराभव झाला, असे होता कामा नये.

काका – अरे तुमची घरी जाण्याची वेळ झाली का?

शर्वरी – नाही. अजून अर्धा तास आहे.

काका – मग आणखी एक महत्त्वाची गोष्ट सांगतो. तुम्ही योगाभ्यास केला, ज्ञान संपादन केले तरी एकदम शहाणे होणार नाही. विकास हा क्रमाक्रमाने हळूहळू होतो. हे समजावून देण्यासाठी ज्ञानेश्वरांनी छान उदाहरणे दिली आहेत. औषध घेतल्याबरोबर लगेच रोग नाहीसा होतो का? बी पेरल्यावर फळ येईपर्यंत वाट पहावी लागते.



सुरवंटाचे फुलपाखरू होते, तसेच लहान अजाण बालकाचा

मोठा जबाबदार माणूस होतो; पण त्यासाठी काही काळ जावा लागतो. विकास हा क्रमा-क्रमाने होतो, परंतु त्यासाठी परिश्रम, सतत अवधान, प्रयत्न, धडपड करावी लागते. बी पेरले म्हणजे क्रमाक्रमाने त्याचे झाड होईल, म्हणून गप्प बसून चालणार नाही. त्याला आवश्यक तेवढे पाणी, खत, ऊन मिळते की नाही हे पाहिले पाहिजे. मुलांनीही विकासाला पोषक ज्ञानसंस्कार सभोवतालच्या वातावरणातून घेतले पाहिजेत. आइनस्टाइन, न्यूटन, एडिसन ही लहानपणी सामान्य मुले होती. पण बुद्धी, विचारशक्ती, तर्कशक्तीच्या जोरावर सतत प्रयोग प्रयत्न करून ते विश्वविख्यात शास्त्रज्ञ बनले. पण एक गोष्ट लक्षात ठेवा, तुमच्या प्रत्येकाचे व्यक्तिमत्व स्वतंत्र आहे म्हणून 'मी आशा भोसले सारखी गाते' अशी भ्रामक समजूत करून घेऊ नका. लता मंगेशकर ती लता मंगेशकर. पण तुम्ही स्वतंत्र, वेगळे आहात. स्वतःच्या शक्ती, बुद्धी नुसार युक्तीने तुमचा विकास करा. अरे, दगडाचाही देव होऊ शकतो. तुम्ही तर मुळातच देवस्वरुप आहात. मग तुम्हा सर्वातून नुसता देव नाही 'महा'देव निर्माण होऊ शकेल.

म्हणजे व्यक्तिविशेष नको- आत्मवान व्हा, स्वतःचे; वेगळेपण जपा.

बरं, आता इथं थांबू या.

□□□

प्रकरण ९

हे विश्वचि माझे घर

****

शर्वरी – काका तुम्हाला ज्ञानेश्वरांचा कोणता विचार जास्त आवडतो?

काका – अग, ज्ञानेश्वरांचे सर्वच विचार श्रेष्ठ आहेत. त्यांचे विचार म्हणजे ज्ञानामृतच. अमृताचा प्रत्येक थेंब अमृतासारखाच गोड असतो. तरी त्यांनी सांगितलेला

'हे विश्वचि माझे घर ।'

हा विचार मला फार भावतो.

सोहम् – सारे विश्व म्हणजे ज्ञानेश्वरांचे घर? असे कसे होईल?

काका – हो. अरे आज आपण विश्वबंधुत्वाच्या गोष्टी करतो; पण ज्ञानेश्वरांनी

सातशे वर्षांपूर्वी हा विचार सांगितला. ज्ञानेश्वरांचा भक्तियोग सांगितल्याशिवाय ज्ञानेश्वरी पूर्णच होणार नाही. भक्ती करायची म्हणजे त्यासाठी देव हवेतच! होय ना? तुमच्या घरी देव आहेत? तुम्ही देवाला नमस्कार करता?

शर्वरी, सोहम् – हो.

सोहम् – नमस्कार करणे म्हणजे भक्ती?

काका – मन व बुद्धी परमेश्वराच्या प्रेमाने भरून जाणे म्हणजे भक्ती, असे ज्ञानेश्वर सांगतात. भक्तीचे रहस्य त्यांनी सामान्यजनांच्या कल्याणासाठी उलगडले आहे. कर्मकांड करणे म्हणजे भक्ती नव्हे, तर आपल्या वर्णाश्रमधर्मानुसार (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र) कार्य करणे, काया–वाचा–मनाने भगवंताची उपासना करणे हाच भक्तियोग, सतत ईश्वराशी जोडलेले असणे म्हणजे भक्ती! पतिव्रतेला पती शिवाय दुसरा विषय नसतो. तसाच खरा भक्त ईश्वराशिवाय दुसऱ्या कोणत्या विषयात रमत नाही. अशाप्रकारे परमेश्वराशी एकरुप झाल्यामुळे त्याच्यामध्ये अनेक सद्‌गुण निर्माण होतात.

आदर्श भक्त द्वेषरहित, सर्वांशी मैत्री असलेला असतो. त्याच्या मनात आपले–परके ही भावना नसते. हे समजावून देण्यासाठी ज्ञानेश्वरांनी अनेक समर्पक दृष्टान्त दिले आहेत.

गाईची तृषा हरूं। का व्याघ्रा विष होऊनि मारूं।
ऐसे नेणेचि का करूं। तोय जैसें।। (ज्ञा. १२–१४७)

गायीची तहान भागवू की वाघाला विष देऊन मारून टाकू, असे पाण्याच्या मनात कधी येते का? या एकत्वाच्या भावनेमुळे भक्त सर्व प्राण्यांशी मैत्री करतात, 'मी–तू' ही भाषा त्यांच्याजवळ नसते. ते पृथ्वीप्रमाणे क्षमाशील असतात, संतोषी असतात. अशा भक्तांना कसलीच इच्छा नसते, कशाचीही अपेक्षा नसते. तो भक्त निरिच्छ, निरपेक्ष व सदैव तृप्त असतो. अशा भक्ताच्या मनात वैर भावनेला थाराही नसतो.

जो खांडावया घावो घाली।
का लावणी. जयाने केली।
दोघां एकचि साउली। वृक्षु दे जैसा ।। (ज्ञा. १२/१९९)
ना तरी इक्षुदंडु। पाळितया गोडु।
गाळितया कडु। नोहेचि जेवी।। (ज्ञा. १२-२००)

फांदी तोडण्यासाठी जो घाव घालतो व ज्याने हे झाड लावलेले असते, त्यांना वृक्ष सारखीच सावली देतो. ऊस लावणारा, त्याला पाणी देऊन वाढवणारा आणि चरकात घालून पिळणारा या सर्वांना ऊस सारखीच गोडी देतो. त्याप्रमाणे या भक्तांच्या ठिकाणी शत्रू-मित्रांविषयी सारखाच भाव असतो. मान व अपमानांना तो सारखाच लेखतो. निंदा व स्तुती यांना तो समान मानतो.



समुद्र जसा पाऊस न पडल्याने आटत नाही. किंवा गंगादी नद्यांचा समावेश झाल्याने किंवा अतिवृष्टी झाल्याने आपली मर्यादा सोडत नाही, त्याप्रमाणे (प्रयत्नावाचून, नशिबाने व्हावा तसा) लाभ झाला तरी संतुष्ट

होत नाही व काही न मिळाल्याने खेदही मानत नाही.

वारा ज्याप्रमाणे एकाच ठिकाणी, एकच जागा धरून राहत नाही, त्याप्रमाणे तो कोठेही एका ठिकाणी आश्रय धरत नाही. ज्या प्रमाणे आकाशाच्या सर्व विस्तारात वारा राहात असतो, त्याप्रमाणे संपूर्ण जग हे त्याचे विश्रांतीस्थान असते. संपूर्ण विश्व हेच माझे घर आहे असा त्याचा दृढनिश्चय झालेला असतो. फार काय सांगावे, सर्व स्थावर जंगमात्मक जग जो आपणच स्वत: बनलेला असतो. सर्व जग हेच माझे राहण्याचे ठिकाण आहे असा त्याचा निर्धार अंत:करणात झालेला असतो. स्थावर-जंगम, जड-चेतन जे जे काही आहे ते ते सर्वच जो स्थूल दृष्टीने नव्हे तर अभेद अनुभवाने स्वत:च बनलेला असतो. ज्ञानेश्वर म्हणतात-

हे विश्वचि माझे घर। **ऐसी मति जयाची स्थिर।**
किंबहुना चराचर। **आपण जाहला।।** (ज्ञाने. १२-२१३)

सोहम् - म्हणजे काय ते नाही समजले.

काका - थांब. आणखी सोपे करून सांगतो.

हे बघ, दुसऱ्याच्या घराला आग लागली की, आपण पाणी घेऊन धावू का?

सोहम् - नाही.

काका - आपल्या घराला आग लागली तर?

सोहम् - आपण धावत जाऊन पाणी आणून ती आग विझवण्याचा प्रयत्न करू.

काका - परंतु या भक्ताला सर्व जगच आपले घर वाटत असल्याने सर्व जगातील लोकांना तो आपले मानतो. सर्व जगातील घरे त्याला आपल्या घराप्रमाणे वाटतात.

समजा एका टेबलाला काठीने मारले. खुर्ची आपटली तरी भक्ताला वेदना होतील किंवा त्या जडवस्तूंशीही तो भावनेने एकरुप झालेला असतो. अशा प्रकारे त्या भक्ताचा आपपरभाव नाहीसा झालेला असतो.

त्याचा भाव विश्वात्मक होतो. वाऱ्याप्रमाणे तो सर्व जगात संचार करतो. सर्व जग त्याला आपले घर वाटावे, अशी त्याची उदार मनोवृत्ती असते. फार काय स्थावर जंगमांशीही तो एकरुप होतो. ज्ञानेश्वरांची ही भक्ती भोळी-भाबडी, अडाणी नाही तर ही ज्ञानोत्तर भक्ती आहे. ज्ञानाने परिपूर्ण अशी भक्ती आहे.

'मी' 'माझे' हा संकुचित दृष्टीकोन आहे. मी माझ्या आईवडिलांचा माझ्या भावंडांचा असे नसून मी सर्व जगाचा आहे, मी फक्त माझ्या सुखाचा, माझ्या कुटुंबियांच्या सुखाचा विचार न करता सर्व जगाच्या सुखाचा विचार करणार, विश्वाच्या सुखासाठी धडपड करणार. संत सर्व भारतभर फिरले, काही जणांनी परदेशातही भ्रमण केले त्यामागे हाच विशाल दृष्टिकोन होता.

भक्त विश्वाचे, विश्व भक्तांचे!

ज्ञानेश्वरांचे मनही असेच आकाशाएवढं मोठं व समुद्रासारखं विशाल होतं. ज्या समाजानं त्यांना अपमानाची वागणूक दिली त्यांना त्यांनी आपलं मानलं, जनसामान्यांना आपलं मानलं. त्यांचे अज्ञान पाहून त्यांना सुयोग्य ज्ञान देण्यात आपले जीवन खर्च केलं. ज्ञानेश्वरांनी हा भक्तियोग नुसता सांगितला नाही तर प्रत्यक्ष आचरणात आणला. ज्ञानेश्वर स्वत: सर्व श्रेष्ठ ज्ञानी भक्त, महान वैष्णव व विश्वमित्र होते!

□□□

प्रकरण
१०

मज हृदयी सद्‍गुरू

****

सोहम् - काका, ज्ञानेश्वरी खरंच खूप छान आहे; पण ज्ञानेश्वरीची विशेष गोष्ट कोणती?

काका - एकच गोष्ट सांगता येणार नाही. परंतु ज्ञानेश्वरीतून दिसणारी ज्ञानेश्वरांची पराकाष्ठेची गुरुभक्ती, आत्यंतिक नम्रता व मराठी भाषेचा सार्थ अभिमान ह्या तीन गोष्टी विशेष आहेत.

शर्वरी - ज्ञानेश्वरांचे गुरु म्हणजे निवृतिनाथ नं?

काका - हो! बाळांनो आपण एखाद्या मंदिरात गेलो की आपल्याला मंदिरात, मंदिराच्या

आवारात विविध देव-देवतांचे दर्शन होते, तसे ज्ञानेश्वरी वाचताना ठिकठिकाणी गुरुभक्ती, नम्रभाव दिसतो.

ज्ञानेश्वरी सांगताना ज्ञानेश्वरांसमोर निवृत्तीनाथ बसले होते. ज्ञानेश्वर सांगतात, **'तेणे कारणे मी बोलेन।'** त्यांच्या कृपेमुळे मी बोलू शकेन. नाहीतर भगवद्गीतेवर भाष्य करणे ही गोष्ट माझ्या अवाक्याबाहेरची आहे. परंतु,

परि एथ असे एक आधारु। तेणेचि बोले मी सधरु।
जे सानुकूळ श्रीगुरु। ज्ञानदेव म्हणे।। (ज्ञा. १-७५)

सद्गुरु निवृत्तीनाथांचा मला आधार असल्याने ते अनुकूल असल्याने मी धीट झालो आहे.

ज्ञानेश्वर आपल्या गुरुंना सूर्य, गणपती, माता, परमात्मा या स्वरुपात पाहतात, ते म्हणतात-

'मज हृदयी सद्गुरु।
जेणे तारिलो हा संसारपुरु।
म्हणोनि विशेषे अत्यादरु। विवेकापरी।। (ज्ञा. १-२२)

माझ्या हृदयात सद्गुरुंचा निवास आहे. त्यांनी या संसाररुपी महासागरातून अक्षरश: तारून नेले, असे ते सांगतात. कारण या भावंडांची समाजाने जी अवहेलना व छळ केला होता, त्या अन्यायाखाली ही मुले चिरडून गेली असती. परत स्वत:च्या पायावर उभीच राहू शकली नसती. श्रीनिवृत्तीनाथ विवेकी होते. वैराग्य संपन्न होते. त्यांच्या सहवासामुळे, आधारामुळे ज्ञानदेवादी भावंडांच्या जीवनाला अर्थ प्राप्त झाला. नाहीतर ही बालके सामाजिक अपमान, अवहेलना यांच्या वादळात बुडाली असती; पण या गुरुंनी त्यांना तारले. सन्मार्ग दाखविला. म्हणून गुरू त्यांचे 'सारसर्वस्व' आहेत, 'चिंतामणी' आहेत; 'दिव्य अंजन' आहेत. ज्ञानेश्वर गुरुंना 'प्रभातसूर्य', 'नित्यकारुण्यसिंधू' असे म्हणतात.

ज्ञानेश्वरांनी गुरुंची वाङ्मयीन भावपूजा किंवा मानसपूजा केली आहे. मनाने, मनापासून, साऱ्या उदात्त कल्पनांनी, पवित्र भावनेतून

केलेली पूजा म्हणजे मानसपूजा. ज्ञानेश्वर म्हणतात-

आता हृदय हे आपुले। चौफाळूनिया भले।
वरी बसऊ पाऊले। श्रीगुरुची।। (ज्ञा. १५-१)

ज्ञानेश्वर आपल्या गुरुंची पाद्य पूजा करतात. पण या पूजेसाठी चौरंग कुठला, तर शुद्ध असलेल्या अंत:करणाचा. श्रीगुरुंचे आपण एकुलते एक शिष्य आहोत, श्रीगुरुंनी आपल्यावर कृपा करून, आपल्याला तत्त्वबोध देऊन आपल्या जवळील अज्ञान नाहीसं केले, त्यामुळे आपण धन्य झालो, अशी ज्ञानेश्वरांची भावना आहे. ज्ञानेश्वर म्हणतात-

सूर्ये अधिष्ठिली प्राची। जगा जाणीव दे प्रकाशाची।
तैशी वाचा श्रोतया ज्ञानाची। दिवाळी करी।। (ज्ञा. १५-१२)

सूर्य पूर्वेला उगवला की तो जगाला प्रकाशाचे राज्य देतो. त्याप्रमाणे श्रीगुरु चरणसेवेने सौभाग्य लाभलेली वाणी श्रोत्यांना ज्ञानाची विपुलता करते. ज्ञानाचा प्रकाश देते. वैभव प्राप्त करून देते. दिवे लावून दिवाळी करण्यापेक्षा ज्ञानी होऊन ज्ञानाचा प्रकाश सर्वत्र करणे ही खरी दिवाळी आहे, असे त्यांना वाटते.

ज्ञानेश्वर म्हणतात, माझ्याशिवाय इतका सुदैवी कोणी नाही. कारण मी गुरुंचे एकुलते एक तान्हे मूल आहे. त्यांच्या कृपेला मी एकच ठिकाण आहे. चातक पक्ष्यासाठी मेघ जसा वृष्टी करतो, त्याप्रमाणे सद्गुरुंनी माझ्याकरता केले आहे. म्हणून माझे रिकामे तोंड जरी बडबड करू लागले तरी गीतेसारख्या ब्रह्मरसाने भरलेले गोड शास्त्र त्यातून सहज प्रकटते. अनुकूल दैवामुळे वाळूची रत्ने होतात. जीव घ्यावयास आलेला प्रेम करून जातो, त्याप्रमाणे सद्गुरुंनी माझा अंगीकार केला आहे.

ज्ञानेश्वरी सारखा अद्वितीय ग्रंथ निर्माण करण्याचे श्रेय, ज्ञानेश्वर कदापिही स्वत:कडे घेत नाहीत. गुरुकृपेने हा ग्रंथ पूर्ण झाला असे ते सांगतात-

परी साचचि गुरुनाथे। निमित्त करुनि माते।
प्रबंधव्याजे जगाते। रक्षिले जाणा।। (ज्ञाने. १८-१७६५)

खरोखर गुरुमहाराजांनी मला निमित्त करून, हा प्रबंध रचून, विश्वाचे कल्याण केले आहे, रक्षण केले आहे, हे लक्षात घ्या.



तैसे निवृत्तिनाथाचे। गौरव आहे जी साचे।
ग्रंथु नोहे कृपेचे। वैभव इथे।। (ज्ञा.१८-१७५०)

हा माझा ग्रंथ गुरुकृपेचे ऐश्वर्य आहे. गुरुंनी केलेला शांत रसाचा वर्षाव म्हणजे ज्ञानेश्वरी ग्रंथ. मी एक साधा, बापडा कृतार्थ होण्याच्या उद्देशाने त्यांच्या समोर उभा राहिलो. एवढ्याचसाठी त्यांनी मला प्रस्तुत ग्रंथाचा कर्ता म्हणून नावलौकिकाला आणले. गुरुसेवेने प्राप्त झालेले धन स्वामी निवृत्तीनाथांनी या ग्रंथरुपाने मला दिले आहे असे ते सांगतात.

सोहम् - कमाल आहे. स्वतः ज्ञानेश्वरी सांगून सर्व श्रेय गुरुंना द्यायचे. केवढी ही गुरुभक्ती.

काका - ही तर काहीच नाही. उद्या मी तुम्हाला गुरुगौरव-स्तोत्राचीच माहिती देतो

□□□

प्रकरण ११

गुरु क्षेत्र गुरु देवता

****

सोहम् - काका, ज्ञानेश्वरांच्या मनात निवृत्तीनाथांबद्दल किती आदर होता?

शर्वरी - ज्ञानेश्वर निवृत्तीनाथांना देव मानायचे का?

काका - होय.

शर्वरी - गुरु परमात्मा परेशु ।
ऐसा हा दृढविश्वासू।

असं भक्तिगीत ज्ञानेश्वरांचेच आहे नं?

सोहम् - अगं, भक्तीगीत नव्हे, अभंग.

काका - पण ज्ञानेश्वरांची गुरुभक्ती, अनन्य साधारण आहे, उत्कट आहे. भगवद्गीतेतील 'आचार्योपासनम्' या एका शब्दावरुन

ज्ञानेश्वरांनी गुरुगौरवाच्या ब्याण्णव (९२) ओव्या रचल्या. ज्ञानेश्वरांच्या नाथपंथामध्ये गुरुचे स्थान सर्वात मोठे आहे. गुरु हाच त्यांनी परमेश्वर मानला आहे. **'गुरु हा संतकुळीचा राजा। गुरु हा प्राणविसावा माझा।'** असे त्यांनी एका अभंगात म्हटले आहेच,

ज्ञानेश्वरांच्या अंत:करणात गुरुसेवेविषयी नितांत प्रेम होते. त्यातून समोर प्रत्यक्ष निवृत्तीनाथ बसलेले. मग ज्ञानेश्वरांचा शब्द झरा असा जोमाने वाहू लागतो की तो थांबणे व थांबवणे केवळ अशक्य होऊन बसते. गुरुभक्त स्वत:ला गुरुसेवेला विकून घेतो. तो गुरुचे गाव, देश, गुरुसंबंधी सजीव व निर्जीव वस्तु यांच्या प्रेमाने वेडा झालेला असतो. त्याला गुरुसेवेशिवाय काहीच गोड लागत नाही. आपण आपले चित्त, मन, इंद्रिये सर्व गुरुकुलाला अर्पण करावे. आपणा स्वत:स गुरुकृपेचे घर करावे असे त्यांना वाटते.

ज्याप्रमाणे विरहिणीच्या चित्तात तिचा पती असतो, त्याप्रमाणे ज्या देशात गुरुचे घर असते तो देशच त्याच्या मनात वस्ती करून असतो.

गुरुगृह जये देशी। तो देशुचि वसे मानसी।
विरहिणी का जैसी। वल्लभाते ।। (ज्ञाने. १३-३७५)

गुरुप्रमाणे तो वेडाच झालेला असतो. गुरुविषयी बोलणे त्याला आवडते. वासराप्रमाणे गुरुच्या आज्ञेचे दावे त्याच्या गळ्यात अडकलेले असते. त्याला इतरत्र धावता येत नाही. गुरुची आज्ञा त्याला शिरसावंद्य असते.

गुरुबद्दल त्याच्या मनात अपार निष्ठा असते. गुरु केव्हा भेटतील अशी वाट पाहत तो भक्त एका क्षणाला युगाहून मोठे मानतो. अशा वेळी कोणी गुरुच्या गावाहून आले तर, दरिद्री पुरुषास संपत्तीचा ठेवा सापडावा, अथवा आंधळ्याला पुन: दृष्टी यावी किंवा भिकाऱ्याला इंद्रपद मिळावे तसा आनंद शिष्याला होतो.

गुरुवर शिष्याचे अत्यंत प्रेम असते. तो अंत:करणाने गुरुची पूजाच करत असतो. गुरुची प्राणप्रतिष्ठा करून काया-वाचा-मनाने तो गुरुशी

संबंधित होतो. ज्ञानाच्या आवारात असणाऱ्या आनंदरुप देवळामध्ये गुरुरुपी लिंगाला ध्यानरुपी अमृताचा तो अभिषेक करतो. ज्ञानरुपी दिव्याने ओवाळून ऐक्य भावाचा नैवेद्य दाखवतो.

सोहम् – म्हणजे काय? मला समजले नाही.

काका – गुरुंकडून त्याला ज्ञान मिळते. आनंद समाधान लाभते. गुरुंनी दिलेल्या ज्ञानाचा तो विकास विस्तार करतो. गुरुंच्या विचाराशी तो एकरुप झालेला असतो. गुरुशिष्यांचे मतैक्य मनोमिलन झालेले असते.

कधी ज्ञानेश्वर गुरुला माऊली मानतात. तर कधी 'क्षीरसमुद्र' समजतात. शिष्य कधी गरुड होऊन नम्रतेने उभा राहतो तर कधी आई मानून तिच्या मांडीवर आनंदाने लोळतो. तो कधी वासरू होतो तर कधी मासोळी व पक्ष्याचे पिलू होतो!

तो नेहमी म्हणतो की गुरुची सेवा चांगली करुन त्यांच्या आशीर्वादाने मी त्यांचा सर्व परिवार होईन. पूजेची उपकरणी होईन. हे श्रीगुरु पुष्कळांची आई आहेत. पण ते माझ्या एकट्याचीच आई व्हावेत असे समजून मी त्यांच्याकडून तशी शपथ घेववीन. श्रीगुरुंच्या प्रेमाला माझा छंद लावीन. त्यांच्याकडून एकपत्नीव्रत घेववीन, गुरुची कृपा हाच एक पिंजरा तर गुरुसेवा ही माझी मालकीण होईल. श्रीगुरुंचे राहते घर, तेथील चाकर, घराचे उंबरे मीच होईन.

श्रीगुरुंशी आपण किती एकरुप व्हावे याचे मोठ्या कौतुकाने ज्ञानेश्वर वर्णन करतात, श्रीगुरुंच्या खडावा मीच होईन. त्यांच्या पायात मीच घालीन, त्यांचे छत्र मीच व धरण्याचे काम मीच करीन, गुरुंचे आसन, अंगावरचे अलंकार, वस्त्र मीच होईन. गुरुंचे मन जिकडे जाईल ती वस्तू मीच होईन, श्रीगुरुंच्या श्रवणरुपी अंगणात असंख्य शब्द मीच होईन, त्यांचा स्पर्श, रस, गंध मीच असेन.

हा देह जेथपर्यंत असेल व तो पडल्यावरही मी त्यांचीच सेवा करीन. जेथे माझ्या गुरुंचे चरण उभे राहतील त्या जागी माझ्या शरीराची मी माती पसरवीन.

इथे शरीरींची माती। मेळवीन तिये क्षिती।
जेथ श्रीचरण उभे ठाती। श्रीगुरुंचे।। (१३-४३२ ज्ञाने.)

ज्या पाण्याला ते स्पर्श करतील त्यात माझ्यातील जलतत्त्व मी समर्पण करीन, श्रीगुरुंच्या पंख्यातील वारा व तेजातील तेज मी होईन, ज्या पोकळीत गुरु निवास करतील त्या पोकळीत मी माझ्या शरीरातील आकाश लयास नेईन,

अशी गुरुसेवा जन्मभर किंवा कोट्यावधी कल्पापर्यंत करता यावी असे शिष्याला वाटते. गुरुसेवा हाच त्याचा छंद किंवा नित्य कर्म असते. त्याच्या दृष्टीने गुरु हेच क्षेत्र, गुरु हीच सेवा, गुरु हीच देवता, गुरुच माता-पिता आणि गुरुपूजा हा एकच मार्ग तो जाणत असतो.

गुरु क्षेत्र गुरु देवता। गुरु माता गुरु पिता।
जो गुरुसेवेपरौता। मार्ग नेणे।। (१३-४४६ ज्ञाने.)

श्रीगुरुंचे द्वार म्हणजे त्याचे सर्वस्व, तर गुरुवाक्याचा मंत्र हेच शास्त्र तर गुरुचरणांचा स्पर्श म्हणजे तीर्थ! त्यांच्या पायाखालची धूळ म्हणजे मोक्ष!

मला समजतं आहे की हे विचार तुम्हाला अपरिचित नवीन वाटतात, कारण आपली गुरुपरंपरा फार थोड्या प्रमाणात अस्तित्वात आहे. आज पैसा मिळतो म्हणून शिकवणारे शिक्षक आहेत, काही जण तर पगार घेऊनही टाळाटाळ करणारे असतील. मग तुमच्या मनात अशी गुरुभक्ती कशी निर्माण होणार?

शर्वरी - काका, दहा शिक्षकांपैकी एखादेच शिक्षक चांगले शिकवतात.

सोहम् - आमचे शिक्षक तर...

काका - नको, नको त्यावर बोलू या नको. पूर्वी आपल्या भारतात श्रेष्ठ गुरु परंपरा होती. श्रीराम - विश्वामित्र, श्रीकृष्ण- सांदिपनी, कृष्ण-अर्जुन, द्रोणाचार्य- अर्जुन, द्रोणाचार्य-एकलव्य अशा गुरुशिष्यांच्या कित्येक जोड्या सांगता येतील. या शिवाय श्रीनिवृत्तीनाथ-ज्ञानेश्वर ही

उत्तम जोडी आहेच.

तुम्हाला कोणती गुरुशिष्याची जोडी माहीत आहे का?

शर्वरी – सोहम् – हो ऽऽऽ. रामकृष्णपरमहंस व विवेकानंद.

काका – वा! छान. हे सर्व गुरु ज्ञानी व शिष्यांवर पुत्रवत प्रेम करणारे व निःस्वार्थी होते. म्हणूनच शिष्यांच्या मनात त्यांच्याविषयी आदरभाव, प्रेमभाव, निष्ठा, नम्रता, समर्पणभाव निर्माण होत असे. हे प्रेम हे बाहेरून येत नाही. अंतःकरणातून येते. ही गुरुशिष्यांची प्रेमभावना इतकी उच्चकोटीची असते की हिमालयाची उंची तिच्यापुढे कमी वाटावी.

धन्य ते गुरु, धन्य ते शिष्य!

□□□

प्रकरण
१२

अपत्य बोले बोबडी वाचा

****

सोहम् - काका, तुम्ही ज्ञानेश्वरी नेहमी वाचता?

काका - वेळ मिळेल तेव्हा वाचतो.

शर्वरी - ते काय गोष्टींचे पुस्तक आहे का? मग ती तुम्ही सारखी का वाचता ?

काका - ज्ञानेश्वरीतील विचार सुंदरच आहेत. पण मला ज्ञानेश्वरीची भाषा आवडते. भाषा खूप मधुर आहे. भाषेत खरोखर अमृताची गोडी आहे, कारण वृत्तीत नम्रता आहे. त्याशिवाय बोलण्यातून माधुर्य प्रकटच होणार नाही. खरोखर नम्रता हा सर्वश्रेष्ठ गुण आहे. ज्ञानेश्वरीतून आपल्याला नम्रता, ऋजुत्वभाव,

आईची माया, ममता, प्रेम सर्व शब्दांतून ओसंडताना दिसते. समाजाने ज्ञानेश्वरांचा छळ केला, पण त्याच समाजाला ज्ञानेश्वरांनी आईच्या मायेने जवळ केले. संपूर्ण जीवसृष्टीवर प्रेम करून आपले माऊलीपण सिद्ध केले.

'वक्ता नोहे श्रोते विण।' असे म्हणतात, ज्ञानेश्वर 'वक्ता' होते व अज्ञानी–बहुजन समाज 'श्रोता' होता, पण मी कोणी फार ज्ञानी, पंडित असा मोठा वक्ता आहे व समोर बसलेला समुदाय अज्ञानी, असमंजस आहे. आपण त्यांना सज्ञान करणार आहोत असा अहंभाव ज्ञानेश्वरांच्या मनात कधी नव्हता. ते श्रोत्यांना जणू आपल्या स्थानी बसवतात.

श्रोत्यांचा गौरव करताना ज्ञानेश्वर म्हणतात,



अहो, अर्जुनाचिये पांती। परिसणया योग्य होती।
तिही कृपा करुनि संती। अवधान द्यावे।। (१–६१ ज्ञाने.)

येथे ज्ञानेश्वरांच्या मनातील श्रोत्यांविषयीचा आदरभाव व्यक्त होतो. ज्ञानेश्वर म्हणतात, अहो, अर्जुनाच्या पंक्तीला बसून ऐकण्याची ज्यांची योग्यता आहे, त्या संतांनी कृपा करून इकडे लक्ष द्यावे. ज्ञानेश्वर श्रोत्यांना

कृष्णासखा अर्जुन मानतात; पण स्वत:कडे श्रीकृष्णाचे कर्तृत्व घेत नाहीत. ज्ञानदेव म्हणजे ज्ञानाचे सागर! ज्ञानेश्वर स्वत:कडे अज्ञ बालकाचे बालपण घेऊन श्रोत्यांना माय-बापांचे थोरपण देतात.

जैसा स्वभावो मायबापांचा।
अपत्य बोले जरी बोबडी वाचा।
तरी अधिकचि तयाचा। संतोष आथी।। (१-६४ ज्ञाने.)

लहान मूल बोबडे बोल बोलले तरी इतरांपेक्षा अधिक संतोष आईवडिलांना होतो. हा आईवडिलांचा स्वभाव आहे. म्हणून श्रोतेहो तुम्ही संत सज्जन आहात, थोर अंत:करणाचे आहात म्हणून मी धिटाई व लडिवाळपणा करीत आहे, असे ते सांगतात. तुम्ही वक्ता म्हणून माझा स्वीकार केला आहे. तसे मी काही कमी जास्त बोललो तर मला क्षमा करावी अशी ते प्रार्थना करतात. ते स्वत:ला टिटवी, मंदमती, चिलट म्हणतात, तर श्रीगुरु निवृत्तीनाथांना 'संतकृपादीपकु', 'परीस', 'अमृत', 'कामधेनू', 'सिद्धसरस्वती' या शब्दांनी गौरवतात. गीतेवर भाष्य करण्याचे कर्तृत्व आपले नसून आपले गुरु निवृत्तीनाथ यांचे आहे असे ठिकठिकाणी सांगतात.

आता आपण लक्ष द्यावे. आपण मला बोलवीत आहात- 'तुम्ही बोलविल्या मी बोलेन-' म्हणून मी गीतेवर भाष्य करीत आहे. ज्याप्रमाणे लाकडी कळसूत्री बाहुली सूत्रधाराची दोरी नाचवील तशी नाचते, त्याप्रमाणे मी आपल्या कृपेतील असून साधूंचा केवळ निरोप्या आहे. त्यांनी मला वाटेल तसे नटवावे. अशी आपली कळसूत्री बाहुलीची भूमिका साधूंच्या निरोप्याची भूमिका ग्रंथाच्या सुरवातीलाच व्यक्त करतात.

ग्रंथाच्या समाप्तीच्या वेळीही ही नम्रता प्रकर्षाने दिसते. गीतेवर भाष्य करणारा मी एक रंक- गरीब मनुष्य आहे, असे ते सांगतात, माझ्या सारख्या सामान्य माणसाला मराठी भाषेत गीता आणणे अशक्य आहे. बाप पुढे जात असता त्याच्या पावलांच्या मागोमाग जर मूल गेले तर त्या मुलाला बाप जेथे गेला तेथे पोचता येते. त्याप्रमाणे -

तैसा व्यासांचा मागोवा घेतु। भाष्यकारांते वाट पुसतु।
अयोग्यही मी न पवतु। कें जाईन।। (१८-१७२२ ज्ञाने.)

व्यासांचा माग घेत घेत, भाष्यकारांना वाट विचारीत विचारीत मी अयोग्य मनुष्यही गीतार्थ सांगण्यास प्रवृत्त झालो आहे. ज्ञानेश्वरांजवळ अगाध ज्ञान होते. उत्तुंग कल्पनाशक्ती होती, उच्च दर्जाची प्रतिभा होती. ज्ञानेश्वरी भगवद्गीतेचा सरळ अनुवाद किंवा भाषांतर नाही तर ते स्वतंत्र भाष्य आहे. भावार्थ दीपिका आहे.

ज्ञानेश्वर ग्रंथाचे कर्तृत्व आपले गुरु निवृत्तीनाथांना देतात. मी शिकलो नाही, अथवा वाचले नाही, मी गुरुची सेवाही जाणत नाही. अशा मला ग्रंथ रचण्याची योग्यता कुठून असणार? असे ते नम्रपणे म्हणतात, मी म्हणजे कळसूत्री बाहुले. गुरुंचे पाईकपण पत्करले व त्यांनी सांगितले ते पुरोहितासारखे बोलले. ग्रंथ सांगताना माझ्याकडून जे अधिक उणे झाले असेल ते आपण पोटात घालावे. आपल्या पायाची भेट झाली हे माझे भाग्य उदयाला आले.

किंबहुना तुमचे केले। धर्मकीर्तन हे सिद्धी गेले।
येथ माझे जी उरले। पाईकपण।। (१८-१७९२ ज्ञाने.)

तुमच्या कृपेने केलेले हे धर्माचे व्याख्यान शेवटाला गेले. या ठिकाणी माझा काय• तो फक्त सेवकपणाच उरला! असे सांगतात.

ज्ञानेश्वरांकडून आपल्याला काय शिकता येईल ?

शर्वरी - सोहम् - नम्रपणा.

काका - बरोबर. उद्धटपणे, कठोर बोलणे सोपे. पण नम्रतेने वागणे फार कठीण. आपला नम्रपणा आपण जपला पाहिजे. आपल्याकडे नसल्यास तो आपल्यामध्ये आणला पाहिजे. आपल्या जवळचे ज्ञान विनम्रपणे इतरांना दिले पाहिजे.

□□□

प्रकरण १३

माझा मराठाचि बोलू कौतुके

****

सोहम् – काका, संस्कृत भाषा सर्व भाषांची प्रमुख भाषा. मग ज्ञानेश्वर मराठीचे एवढे कौतुक का करतात?

शर्वरी – अरे, संस्कृत भाषा अवघड आहे. तू मराठीतून बोलू शकतोस, संस्कृतमधून बोलू शकतोस का?

सोहम् – शिकवलं तर बोलता येईल, हो किनई काका ?

काका – ज्ञानेश्वरांना संस्कृत भाषा आवडत नव्हती व फक्त मराठीच प्रिय होती असे नाही. कारण ज्ञानेश्वरांनी स्वत:चा कधी विचारच केला नाही. ते द्रष्टे होते. समाजहिताचा विचार करणारे

होते.

संस्कृत ही देवभाषा मानली जाते. त्यामुळे वेद, उपनिषदे, गीता, भागवत, सर्व तत्त्वज्ञान, पारमार्थिक ज्ञान संस्कृत भाषेतून होते. त्यामुळे समाजातील अत्यंत कमी–अल्प लोकांना ते समजत होते. अवगत होते. हे ज्ञान समाजातील सर्व लोकांपर्यंत जावे असे ज्ञानेश्वरांना वाटत होते; पण ते त्यांना त्यांच्या भाषेतून सांगितले तरच समजणार. ज्ञानेश्वरांच्या मनात सर्व समाजातील लोकांविषयी प्रेम होते, कळवळा होता. **'ऐसी कळवळ्याची जाती। लाभावीण करी प्रीती।'** अशी त्यामागे भावना होती. बहुजन समाजाचे हित त्यांना साधायचे होते. त्यामुळे त्यांनी तत्कालीन रुढ परंपरेला, समजुतीला धक्का दिला. त्यांच्याविरुद्ध बंड करण्याचे धाडस दाखवले. संस्कृतमधील ज्ञान मराठीत आणले. त्यांच्या मनात संस्कृत बद्दल आदर होता तर मराठीचा सार्थ अभिमान होता.

माझा मराठाचि बोलु कौतुके।
परि अमृतातेही पैजा जिंकें।
ऐसीं अक्षरें रसिकें। मेळवीन।। (६–१४ ज्ञाने.)

मी कौतुकाने मराठी भाषेतच लिहीन, पण माझे शब्द असे असतील की अमृताहून मधुर. ते अमृताशीही पैज जिंकतील, अशी मधुर, रसाळ शब्दरचना मी रसिकांसाठी करीन. असे ते आत्मविश्वासाने सांगतात.

यापूर्वी मराठी भाषेत ग्रंथनिर्मिती झाली नव्हती. चक्रधरस्वामींचे लीळाचरित्र फक्त अपवाद होते. ज्ञानेश्वरीला लिखित भाषेचे जन्मस्थळ मानावे लागेल. प्राकृत–मराठी भाषेत ग्रंथनिर्मिती करून बहुजन समाजाच्या हितासाठी, संस्कृतनिष्ठांचा रोष ओढवून घेतला.

हे मराठी शब्द कसे–

जिये कोवळिकेचेनि पाडें।
दिसती नादींचे रंग थोडे।
वेधे परिमळाचें बीक मोडे।
जयाचेनि।। (६–१५ ज्ञाने.)

माझ्या मराठी भाषेची अक्षरे, शब्द अतिशय कोवळे आहेत. त्यांच्या कोवळेपणापुढे सुस्वराचे निरनिराळे राग कमी योग्यतेचे दिसतील, ती मराठी अक्षरे इतकी मनोवेधक, चित्ताकर्षक आहेत की सुवासाचे सामर्थ्य नाहीसे होईल, मराठी भाषेचे शब्दवैभव अतिशय कोवळे आहे. जमिनीला हात–पाय न टेकलेल्या तान्ह्याबाळाचे हातपाय–पावले कोवळी लुसलुशीत असतात तसे, हुरड्यासाठी काढलेली कणसे कशी कोवळी असतात तसे.

मराठी भाषेचा रसाळपणा काय वर्णावा?

ऐका रसाळपणाचिया लोभा।

की श्रवणींचि होति जिभा।

बोले इंद्रिया लागे कळंभा।

एकमेका।। (६–१६ ज्ञाने.)

ऐका, रसाळपणाच्या लोभाने कानाला जिभा उत्पन्न होतील व माझ्या शब्दांच्या योगाने इंद्रियांमध्ये परस्पर भांडण लागेल, मराठी भाषेतून असा रस पाझरू लागेल की श्रवणेद्रियांना आश्चर्याच्या जिव्हाच फुटतील. कारण शब्दांना अमृताची गोडी आहे अशी जाणीव श्रवणेद्रियांना झाली आहे. या मराठी भाषेच्या अमृत गोडव्याचे प्राशन करण्यासाठी पंचेद्रियांमध्ये चढाओढ लागली आहे. अशी मराठी भाषा रसाळ व कर्णमधुर आहे.

तसे पाहिले तर शब्द केवळ कानाचा विषय आहे. परंतु जिव्हा म्हणेल की, हा शब्द माझा रसविषय आहे. नाकाला असे वाटेल की शब्दाच्या योगाने मला सुवास मिळावा, असे हे शब्द रसाळ, सुगंधी व कर्णमधुर आहेत. हे मराठी भाषेचे नादमयी सामर्थ्य आहे.

ही मराठी भाषा बोलण्याचा ओघ असा आश्चर्यकारक आहे की, तो पाहिला असता डोळ्यांनाही तृप्ती मिळू लागेल व ते म्हणतील 'हे आम्हाला रुप विषयाचे कोठारच उघडले आहे. संपूर्ण पद जेथे तयार होईल तेथे त्याच्या भेटीकरता अंत:करण बाहेर धाव घेईल व शब्दाला आलिंगन देण्यास बाहुही पुढे सरसावतील. अशी ही मराठी भाषा सुंदर व

अंत:करणाचा ठाव घेणारी आहे.

ऐशी इंद्रिये आपुलालियां भावी।
झोंबती परि तो सरिसेपणेचि बुझावी।
जैसा एकला जग चेतवी। सहस्त्रकरू।। (२–२० ज्ञाने.)
पाहातयां भावज्ञा फावती गुण। चिंतामणीचे।।
(६–२१ ज्ञाने.)

ज्ञानदेव जेव्हा गीताभाष्य मराठीतून करू लागले तेव्हा त्या प्रत्येक शब्दाला इंद्रियसंवेद्य भाव लगटून राहू लागला. ज्ञानेश्वर म्हणतात, इंद्रिये आपापल्या इच्छेप्रमाणे माझ्या शब्दांना लगट करतील. ज्याप्रमाणे एकटाच सूर्य सर्व जगाला आपल्या सहस्त्र किरणांनी जागे करतो, त्याप्रमाणे शब्दाचे व्यापकपण असामान्य आहे असे समजावे. त्याचा विचार करून अभिप्राय जाणणाऱ्याला यात चिंतामणीसारखे गुण दिसून येतील.

ज्ञानदेव मराठी भाषेच्या अमृत गोडव्यात स्वत:ला हरवून बसले होते. ज्ञानदेवांच्या नादमयी शब्दांना अपूर्व असा वेग, गती, ओघ प्राप्त झाला होता. त्या वेगवान भाष्यात, भाषेच्या धबधब्यात सर्व श्रोते भान हरपून बसले होते. भक्तीने परमेश्वराला प्रकट होताना पहावे तसे श्रोत्यांनी अप्रतिम, अभिरुचीसंपन्न मराठी भाषेला प्रकट होताना पाहिले.

ज्ञानदेवांनी म्हटले आहे की आपल्या इंद्रियांना कळू न देता ह्या गीताभाष्याचे सेवन कराल तर श्रोतेहो, तुम्हाला ब्रह्मरस सेवनाचा निश्चित आनंद मिळेल.

आहाच बोलाची वालीफ फेडिजे।
आणि ब्रह्माचियाचि आंगा घडिजे।
मग सुखेंसी सुखाडिजे। सुखाचिमाजि।। (६–२५ ज्ञाने.)

वरवर असलेली शब्दरुप गवसणी काढून, आत ब्रह्मरुपी अर्थ आहे, त्याच्याशी तद्रुप व्हावे. नंतर सुखामध्येच सुखाने रंगून जावे. आपण शब्द कानांनी ऐकतो पण मनाच्या द्वारे तुम्ही हे ब्रह्मरसाने भरलेले, ओथंबलेले शब्द श्रवण केलेत तर सुखाची लयलूट कराल, नवाच आनंद तुम्हाला

होईल.

ज्ञानेश्वरीच्या शेवटच्या ओव्यांमध्येही त्यांचा मराठी भाषेविषयीचा अभिमान व्यक्त होतो. ते सांगतात मी संस्कृतातील गीतेचा मराठीत अनुवाद केल्यामुळे ज्यांना संस्कृत येत नाही, त्यांची मोठी सोय झाली आहे. त्यांना माझी ही प्राकृत टीका वाचून मूळ गीतापठणाचे फळ मिळेल. ज्यांना संस्कृत येते अशांनी संस्कृत गीतेबरोबर माझी टीका वाचली तर त्यांना अधिकच संतोष होईल. ते म्हणतात–

नाना गुंफिली का मोकळी।
उणी न होती परिमळी।
वसंतागर्मीची वाटोळी। मोगरी जैसी। (१८–१७४० ज्ञाने.)

वसंत ऋतूच्या आरंभीची मोगरीची वाटोळी फुले, गुंफलेली असोत किंवा मोकळी असोत, वासाच्या दृष्टीने त्यांच्यात कमीपणा नसतो. त्याप्रमाणे संस्कृत गीतेसह माझी मराठी टीका सांगितली तरी शोभा आणील. (अथवा) संस्कृत गीता न सांगता केवळ माझी मराठी टीकाच सांगितली तरी शोभा दाखविणारच; अशा दोन्ही प्रकारांनी लाभ देणारा ओवीबद्ध काव्यग्रंथ मी केला आहे.

□□□

प्रकरण
१४

एक तरी ओवी

****

सोहम् – काका, खरंच ज्ञानेश्वरी ग्रंथ खूपच चांगला आहे, असे मला वाटायला लागलं आहे.

काका – म्हणजे काय? अरे,

नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी।
एक तरी ओवी अनुभवावी॥

शर्वरी – 'अनुभवावी' म्हणजे काय?

काका – सांगतो. श्रेष्ठ ग्रंथ कालातीत असतो. तो ग्रंथ म्हणजे अक्षरवाङ्मयाचा, तत्त्वज्ञानाचा उत्कृष्ट नमुना असतो.

ज्ञानेश्वरी हा ग्रंथ वाचला, त्याचे पठण केले, पारायण केले तरी समजणारा ग्रंथ नाही. कारण त्या ग्रंथातील विचार, भाव वाचकाच्या

मनापर्यंत पोहचले पाहिजेत. लोणच्यात तिखट, मीठ मुरले म्हणजे ते लोणचे चांगले लागते. तसे हे विचार वाचकांच्या मनापर्यंत जाऊन मुरले पाहिजेत, आपण कथा-कादंबरी वाचतो व त्यातील कथा विसरतो; पण ही कृष्णार्जुनाची कथा हळूवार मनाने सेवन करावी. तिचा आस्वाद घ्यावा.

सोहम् - पण, आम्हाला ज्ञानेश्वरी समजेल का?

काका - अरे म्हणून मी तुम्हाला सर्व ज्ञानेश्वरी अनुभवायला सांगत नाही; पण ज्ञानेश्वरीतील एखादी ओवी तरी तुम्हाला समजून घेता येईल. पाठ करता येईल.

शर्वरी - हो नक्की. आम्ही नक्की पाठ करू.

सोहम् - आम्हाला पसायदान पाठ आहे.

काका - छान ! आता मी तुम्हाला काही ओव्या व त्यांचा अर्थ सांगतो हं.

जैसे शारदियेचिये चंद्रकळे। माजी अमृतकण कोवळे
ते वेचिती मने मवाळे। चकोरतलगे॥ (१-५६ ज्ञाने.)

ज्याप्रमाणे शरद ऋतूतील पूर्णचंद्राच्या किरणांतील सूक्ष्म अमृत-कण चकोर व त्याची पिले सेवन करतात, त्याप्रमाणे हे श्रीकृष्ण अर्जुनाचे प्रेमाख्यान अत्यंत हळुवार मनाने, सावधपणे श्रवण करावे. चित्ताची एकाग्रता असेल तर अर्थ लगेच समजेल.

हे शब्देविण संवादिजे। इंद्रियां नेणतां भोगिजे।
बोलाआधि झोंबिजे। प्रमेयासी॥ (१-५८ ज्ञाने.)

याप्रमाणे चित्त अगदी हळुवार करुन, मनातील वाईट वासनांचा जडपणा काढून टाकून श्रोत्यांनी ही कथा-ज्ञानेश्वरी अनुभवावी.

हिची चर्चा शब्दांवाचून करावी. मनातल्या मनात हिचा विचार करावा. इंद्रियांना पत्ता लागू न देता हिचा उपभोग घ्यावा. हिच्यात प्रतिपादन केलेल्या शब्दांच्या अगोदर त्यात सांगितलेल्या सिद्धान्तांचे, तत्त्वांचे आकलन करावे. ओवीचा मनात विचार करावा व भावार्थ

समजून घ्यावा.

तरी न्यून ते पुरते। अधिक ते सरते।

करुनि घ्यावे हे तुमते। विनवितु असे।। (१-८० ज्ञाने.)

ज्ञानेश्वरीत ज्ञानेश्वरांचा नम्रभाव ठिकठिकाणी प्रकट झालेला आहे. इतके नम्रत्व अन्य कोठेही आढळणार नाही. आधीच गीतातत्त्व गंभीर आहे. या तत्त्वाचे आकलन वेदांनाही झाले नाही. मग माझ्यासारख्या मतिमंदाला कसे साध्य व्हावे? एखाद्या क्षुद्र चिलटाने आपल्या मुठीत आकाश कसे सामावून घ्यावे? परंतु केवळ सद्गुरु निवृत्तीनाथांची कृपा असल्यानेच मी गीतेवर भाष्य करण्याचे धाडस करीत आहे.

तरी उणे असेल ते पुरे करून घ्यावे आणि जास्त असेल ते सोडून द्यावे, अशी माझी आपणास विनंती आहे.

तो शांतुचि अभिनवेला ते परियसा मऱ्हाठे बोल।

जे समुद्राहूनि खोल। अर्थभरित।। (४-२१४ ज्ञाने.)

तो शांतरस ज्यात अपूर्वतेने प्रकटेल, जे अर्थपूर्ण व समुद्रापेक्षाही गंभीर आहे, ते मराठी बोल ऐका, (सूर्यबिंब जरी बचके एवढे-हातात मावण्याजोगे-दिसते, तरी त्याच्या प्रकाशाला त्रिभुवन अपुरे पडते, त्याचप्रमाणे या शब्दांची व्याप्ती आहे.) संशय दूर करून अर्जुनाने युद्धास प्रवृत्त व्हावे यासाठी भगवंत तत्त्वरुप परमेश्वराचे स्वरुप किंवा तत्त्वज्ञान शांत रसात शोभेल अशा रीतीने सांगतात. समुद्राहून सखोल मराठी बोल अर्जुनाने श्रवण करावेत असे भगवान श्रीकृष्ण सांगत आहेत.

पैं भक्ति एकी मी जाणे। तेथ साने थोर न म्हणे।

आम्ही भावाचे पाहुणे। भलतेया।। (९-३९५ ज्ञाने.)

भगवंत सांगतात, मी एक भक्तीच ओळखतो. मग त्या ठिकाणी लहानथोर अशी निवड करीत नाही. आम्ही वाटेल त्याच्या भक्तीरुपी मेजवानीचे पाहुणे आहोत. भगवंत भक्तांच्या थेंबभर पाण्याने किंवा सुदामाच्या मूठभर पोह्याने संतुष्ट होतात. ईश्वराच्या प्राप्तीसाठी मोठेपणाची जरुरी नाही. केवळ मनात भक्ती, भाव असला की ईश्वर संतुष्ट होतो.

म्हणोनि कुळ जाति वर्ण। हे आघवेचि गा अकारण।
एथ अर्जुना माझेपण। सार्थक एका।। (९-४५६ ज्ञाने.)

म्हणून उत्तम कुळ, जात अगर वर्ण हे सर्व निष्फळ आहेत, माझ्या ठिकाणी अनन्य होण्यातच सार्थकता आहे. भक्तिमार्गात जातिभेद महत्त्वाचे नाहीत, ईश्वराशी एकरुपता महत्त्वाची. परमेश्वराच्या ठिकाणी मन जडले की झाले. ईश्वराची प्राप्ती करून घेण्याचा अधिकार फक्त श्रेष्ठ वर्णियांनाच आहे, असे नसून सर्वांना आहे असे ज्ञानेश्वर सांगतात-

जे जे भेटे भूत। ते ते मानिजे भगवंत।
हा भक्तियोगु निश्चित। जाण माझा।। (१०-११८ ज्ञाने.)

जो जो प्राणी दिसेल, तो तो प्रत्यक्ष परमात्मा आहे असे समजावे, हा माझा भक्तियोग आहे, असे निश्चित समज. सर्व प्राणिमात्रात एक परमात्मतत्त्व पाहणे हेच भक्तिमार्गाचे तत्त्व या ठिकाणी स्पष्ट केले आहे. ब्रह्मदेवापासून मुंगीपर्यंत परमेश्वराला जो पाहतो, तोच खरा ज्ञानी होय.

भरुनि सद्भावाचिया अंजुळी।
मियां वोंविया फुलें मोकळीं।
अर्पिली अंघ्रियुगुली। विश्वरुपाच्या।। (११-७०८ ज्ञाने.)

मी शुद्ध भावनारुप ओंजळीत ही ओव्यांरुपी मोकळी फुले भरून विश्वरुपाच्या दोन्ही पायांवर अर्पण केली, असे ज्ञानेश्वर म्हणतात. निवृत्तीनाथांच्या पायांच्या कृपेने, कृपाप्रसादाने मी सोप्या शब्दात गीतेचा भावार्थ सांगितला. शुद्ध भावनारुप अशा माझ्या ओंजळीत ओवीरुपांची मोकळी फुले भरून मी विश्वरुपाच्या दोन्ही पायांवर अर्पण केली आहेत.

पुढां स्नेहा पाझरे। मागां चालती अक्षरे।
शब्द पाठीं अवतरे। कृपा आधी।। (१३-२६३)

ज्ञानी माणसाच्या बोलण्याचे ज्ञानेश्वर येथे वर्णन करत आहेत. तो कोणाशी बोलत असता-पुढे प्रेम पाझरते व मागून अक्षरे चालतात. कृपा आधी प्रकट होते व शब्द मागून प्रकट होतात.

ज्ञानी माणूस आधी फारसा बोलतच नाही. पण तो बोलू लागला

की त्यातून त्याच्या मनातील प्रेम, आपुलकी, कृपाच व्यक्त होते. कोणाला खुपेल असे, कोणाला वर्मी लागेल असे तो बोलत नाही.

मुलांनो, आपल्यालाही नेहमी सत्य परंतु गोड शब्दात बोलता आले पाहिजे.

वाचे बरवें कवित्व। कवित्वीं बरवें रसिकत्व।
रसिकत्वीं परतत्त्व। स्पर्शु जैसा। (१८-३४७)

वाचेला शोभादायक कवित्व आहे व त्या कवित्वात सुरसतेची बहार असावी. या सुरसतेत परमात्म वर्णनाचा संबंध यावा.

ज्ञानेश्वरांच्या साहित्यशास्त्राचे किंवा काव्यशास्त्राचे वर्णन करणारी ही प्रसिद्ध ओवी आहे. वाणी कवित्वाने शोभावी, कवित्वाला रसाळपणा असावा व हे रसाळ काव्य परमेश्वराशी संबंधित असावे. काव्याची एवढी शास्त्रशुद्ध व चांगली व्याख्या ज्ञानेश्वरांनी केली आहे.

चंद्र तेथे चंद्रिका। शंभु तेथे अंबिका।
संत तेथे विवेका। असणे की जी।। (१८-१६३२)

चंद्र तेथे चांदणे असायचेच. शिव तेथे शक्ती असायचीच व संत तेथे सुविचार असायचाच.

धृतराष्ट्र संजयाला विचारतात, कौरव-पांडव यांच्या दोन्ही सैन्याचे काय होईल? संजय सांगतो की, जिकडे योगेश्वर कृष्ण व धनुंधर पार्थ आहे, तेथे श्री, विजय, ऐश्वर्य, नीती यांचे वास्तव्य असते. हे पटवून देण्यासाठी त्यांनी वरील दृष्टान्त दिला आहे.

राजहंसाचे चालणे। भूतळी जालिया शाहाणे।
आणिके काय कोणे। चालावेचिना।। (१८-१७१३)

राजहंसाचे चालणे जगात उत्तम ठरले, म्हणून आणखी कोणी पृथ्वीवर चालूच नये की काय? भगवद्गीता व्यासांसारख्या थोर कवींनी श्लोकबद्ध केली. त्या गीतेवर भाष्य करणारा मी एक सामान्य माणूस आहे. बडबड करीत आहे. हा विचार सांगताना ज्ञानेश्वरांनी वरील दृष्टान्त दिला आहे. व्यासांची विशाल बुद्धी स्मरून माझ्या सारख्या साध्या

माणसाने सर्वसामान्य लोकांसाठी देशी भाषेत गीता सांगितली, असे ते नम्रतेने म्हणतात.

म्हणोनि माझे नित्य नवे। श्वासोश्वासही प्रबंध होआवे।
श्रीगुरुकृपा काय नोहे। ज्ञानदेवो म्हणे।। (१८-१७३४)

म्हणून माझे नित्य नवे श्वासोच्छ्वासही काव्यग्रंथ होतात. गुरुकृपेने काय होणार नाही। असे ज्ञानदेव म्हणतात.

श्रीगुरुंच्या कृपेमुळेच आपण ग्रंथ सांगत आहोत असे ज्ञानेश्वरांनी अनेकदा सांगितले आहे. श्रीगुरु माझ्या हृदयात आहेत, श्रीनिवृत्तीनाथ माझ्यात प्रवेश करून मला बोलते करतात. गुरुकृपेमुळे माझे नेहमी वाहणारे श्वासोच्छ्वासही काव्यग्रंथाचे स्वरुप प्राप्त करतात,

तेथ महेशान्वयसंभूते। श्रीनिवृत्तीनाथसुतें।
केले ज्ञानदेवे गीते। देशीकार लेणे।। (१८-१८०५)

तेथे आदिनाथ शंकर यांच्या परंपरेत उत्पन्न झालेला श्रीनिवृत्तीनाथ सुत (शिष्य) जो ज्ञानदेव, त्याने गीतेवर देशी भाषेचा (मराठी टीकेचा) अलंकार चढविला.

ज्ञानेश्वरीच्या शेवटी या ग्रंथ निर्मितीचे स्थळ, काळ यांचा उल्लेख ज्ञानेश्वरांनी केला आहे. ज्ञानेश्वर म्हणतात, नेवासे येथे-आदिनाथ शंकराच्या परंपरेत निर्माण झालेल्या निवृत्तीनाथांच्या शिष्याने-म्हणजे ज्ञानदेवाने गीतेवर मराठी भाषेचा अलंकार चढविला!

काका - सोहम्, शर्वरी काय सांगा - एक तरी ओवी-
सोहम् - शर्वरी - पाठ करावी.

□□□

प्रकरण १५

पसायदान

****

शर्वरी – काका, आज तुम्ही काय सांगणार?

सोहम् – आम्हाला येते पसायदान, म्हणू?

काका – अरे तुम्हाला पसायदान येते, पण त्याचा अर्थ समजला आहे का?

शर्वरी – नाही.

काका – तुम्हाला पसायदान येतेच. आज त्याचे महत्त्व व अर्थ समजून घेऊया.

सोहम् – काका, पसाय म्हणजे काय?

काका – सांगतो हं. देवाची पूजा, आरती झाल्यावर आपल्याला काय देतात?

सोहम् – प्रसाद.

काका – बरोबर, पसाय म्हणजे प्रसाद.

ज्ञानेश्वरी ग्रंथाचा शेवट करताना ज्ञानेश्वर आपल्या गुरुंकडे या प्रसाद-दानाची मागणी करतात.

ज्ञानेश्वरांचे हे पसायदान अलौकिक आहे. मराठी वाङ्मयात अमर झालेले आहे. ज्ञानेश्वरांना कोणता प्रसाद हवा आहे?

ते म्हणतात, दुष्टांचा कुटिलपणा, दुष्टपणा नाहीसा होऊ दे. त्यांची दुष्टवृत्ती नाहीशी झाल्यावर सत्कर्म, चांगली कामे करण्याची आवड त्यांच्यामध्ये निर्माण व्हावी. प्राण्यांची (सर्व प्राण्यांची–मनुष्यांची) एकमेकांशी जीवाभावापासून मैत्री व्हावी. खल व दुष्ट लोकांचा उद्धार होऊन ते ईश्वरनिष्ठ कसे होतील याची काळजी ज्ञानेश्वरांना लागलेली दिसते. जगातील दुष्ट लोकांच्या वृत्तीत बदल होऊन, दुष्ट कर्मे टाकून सत्कर्मे करावी, अशी त्यांना बुद्धी व्हावी. चोरांनी चोरी करू नये. कष्टाने भाकरी कमवावी. (अभ्यास न करणाऱ्या मुलांमध्ये अभ्यासाची आवड निर्माण व्हावी.) जगातील सर्व लोकांनी एकमेकांशी बंधुभावाने वागावे. (युद्धे नकोत, दहशतवाद नको, इ.)



जगातील पाप नाहीसे व्हावे. सर्व जगात स्वधर्माचा उदय व्हावा. प्राणीमात्र जो जे इच्छिल ते त्याला मिळावे. सगळीकडे धर्माची वाढ

होऊन सर्व लोक सुखी, समाधानी, संतुष्ट व्हावेत.

संपूर्ण कल्याणाचा वर्षाव करणाऱ्या ईश्वरनिष्ठांचा समुदाय या भूतलावर निरंतर सर्व प्राण्यांना भेटो. भगवंताची सेवा करण्यात जे आयुष्य घालवतात, असे संत महात्मे यांचे वास्तव्य पृथ्वीतलावर निरंतर असावे.

सज्जन सर्वांचे आवडते व्हावेत. हे सज्जन कसे चालणाऱ्या कल्पतरुंचे बगीचे- (मनातील इच्छा पूर्ण करणारे), सजीव चिंतामणींचे गाव (लोकांची चिंता दूर करून कामना पूर्ण करणारे), अमृताचे बोलणारे सागर (मधुर, प्रेमळ शब्द बोलणारे), जे कलंकरहित चंद्र (शीतल स्वभावाचे पण कोणताही दोष-अवगुण नसणारे), उष्णतारहित सूर्य- (सर्वांना जीवन देणारे, ज्ञानाचा प्रकाश देणारे, तरीही दाहक, तापट नसणारे) असे हे सज्जन सर्वांना प्रिय होवोत. ज्ञानेश्वरादी भावंडे संत होती, सज्जन होती. तरी समाजाने त्यांना दूर लोटले होते!

त्रैलोक्य सर्व सुखाने पूर्ण होऊन त्याने आदिपुरुषाच्या ठिकाणी अखंडित भजावे. या मृत्यूलोकात विशेषकरून हा ग्रंथच ज्यांचे जीवन होऊन राहिला असेल, त्यांनी इहलोकीच्या व परलोकींच्या भोगांवर विजयी व्हावे. ग्रंथ पठणाने त्यांना इतके सुख, समाधान, परमसंतोष मिळणार आहे की इहलोकातील भोग, ऐश्वर्य व परलोकातील भोग-स्वर्ग इ. वर विजय मिळवावा, त्यांचा विचारही करू नये. त्या दोन्ही प्रकारच्या भोगांहून खूप मोठे मानसिक समाधान, शांती ज्ञानेश्वरी देते. मन तृप्त करते.

तेव्हा विश्वाचे प्रभुराय श्रीनिवृत्तीनाथ म्हणाले, 'हा दान प्रसाद होईल.' या वराने ज्ञानदेव अंत:करणात सुखी झाले.

काका - चला आता सर्वांनी मिळून पसायदान म्हणूया.

□□□

॥ पसायदान ॥

आतां विश्वात्मकें देवें । येणे वाग्यज्ञें तोषावे ।
तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ॥१॥

जे खळांची व्यंकटी सांडो । तयां सत्कर्मी रति वाढो ।
भूतां परस्परे पडो । मैत्र जीवांचे ॥२॥

दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यें पाहो ।
जो जे वांछील तो तें लाहो । प्राणीजात ॥३॥

वर्षत सकळमंगळीं । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ॥४॥

चलां कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणींचे गाव ।
बोलते जे अर्णव । पीयूषाचे ॥५॥

चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहिन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥६॥

किंबहुना सर्वसुखीं । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं ।
भजिजो आदिपुरुखीं । अखंडित ॥७॥

आणि ग्रंथोपजीवियें । विशेषीं लोकीं इये ।
दृष्टादृष्टविजयें । होआवें जी ॥८॥

येथे म्हणे श्री विश्वेशरावो । हा होईल दानपसावो ।
येणे वरें ज्ञानदेवो । सुखिया झाला ॥९॥